

# समर्थांचे नैतिक मानसशास्त्र

लेखक : डॉ. सुभाष के. देसाई
पीएच.डी. (तत्त्वज्ञान)

# समर्थांचे नैतिकमानसशास्त्र

© डॉ. सुभाष के. देसाई
पीएच.डी. (तत्त्वज्ञान)

: मुद्रक, प्रकाशक :
सिंहवाणी प्रिंटर्स–पब्लिशर्स
११ ब, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर – ४१६०१२
फोन : ०२३१ – २६४१६३५ मोबाईल : ९४२३०३९९२५
ई–मेल : drsubhashdesai@gmail.com
वेब साईट : www.subhashkdesai.com

प्रथमावृत्ती
२८ एप्रिल, २०१५

मुखपृष्ठ
निर्मिती ग्राफिक्स, कोल्हापूर

प्रकाशन
रामनवमी २०१५

किमंत : १००/– ₹



# अनुक्रमणिका


| अ.नं | | पान नं. |
|---|---|---|
| १. | मनोगत | ५ |
| २. | संत रामदासांचा नीतिबोध | ११ |
| ३. | जीवन चरित्र | १७ |
| ४. | भगवद्‌गीता आणि दासबोध | २० |
| ५. | दासबोध अद्वैतवेदांत | २७ |
| ६. | दासबोध म्हणजेच मानसशास्त्र | ६३ |
| ७. | रामदासभक्त कवी मोरोपंत | ६१ |
| ८. | श्री राम नाम जप | ७१ |

# सिंहवाणी पब्लिशर्स यांची पुस्तके

११ ब, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर - ४१६०१२.

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | | मूल्य रू. |
|---|---|---|---|
| १. | सॉक्रेटिस | | १५०/- |
| २. | धर्म आणि विज्ञान | | १००/- |
| ३. | कालाची जन्मकथा (डॉ. स्टिफन हॉकिंग यांच्या ए ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाईम पुस्तकाचा अनुवाद) | | १००/- |
| ४. | महायोगी गौतम बुद्ध (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी | २००/- |
| ५. | ग्राहक प्रबोधन | | १००/- |
| ६. | जागतिक घडामोडी | | १२५/- |
| ७. | गायत्री उपासना | | ६०/- |
| ८. | कुस्ती पंढरी | | २५/- |
| ९. | पाश्चात्त्य तत्त्वज्ञ | | ६०/- |
| १०. | आरोग्य | | ६०/- |
| ११. | संतांची मांदियाळी | | ३०/- |
| १२. | दिडशे वर्षांची करवीरची चित्र-शिल्प परंपरा | | २३५/- |
| १३. | हृदय, हृदय शस्त्रक्रिया (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी | १००/- |
| १४. | लामा मिलारेपा | | ६०/- |
| १५. | साक्षी | | १००/- |
| १६. | आधुनिक मानवासाठी नव साधना | | ३५०/- |
| १७. | श्री. दत्ताबाळ समग्र वाङ्मय | | ६००/- |
| १८. | श्री. दत्ताबाळ चरित्र | | १००/- |
| १९. | निधर्मी नैतिकता | | ५०/- |
| २०. | मराठा सम्राट छत्रपती शिवाजी महाराज | | १५०/- |
| २१. | एक हजार वर्षातील विज्ञान | | १०/- |
| २२. | युरोप आणि अमेरिकेतील स्वामी विवेकानंद | | २५०/- |
| २३. | स्टोरी रायटिंग (इंग्रजी) | | ५०/- |
| २४. | द रिलेव्हन्स ऑफ सायन्टीफिक कन्क्ल्यूजन्स ऑफ रिलिजन (इंग्रजी) | | १००/- |
| २५. | फीचर रायटिंग (इंग्रजी) | | २००/- |
| २६. | समर्थांचे नैतिक मानसशास्त्र | | १००/- |

**सिडी - पी.डी.एफ. फॉरमॅट** **प्रत्येकी ५०/-**

१. गौतम बुद्ध (मराठी / इंग्रजी)
२. कालाची जन्मकथा
३. लामा मिलारेपा
४. मराठा सम्राट छत्रपती शिवाजी महाराज
५. हिमालयातील २५ वर्षे
६. हृदय, हृदय शस्त्रक्रिया

# मनोगत

**सा**ठ वर्षापूर्वीची ही आठवण आहे. गारगोटीमधला सोनाळी भाग हा त्यावेळी स्वतंत्र छोटा गाव. त्यातील आमच्या घाटगे देसाई-इनामदारांच्या वाड्यात विठ्ठलराव देसाई हे माझे चुलत आजोबा. त्यांच्या सामाजिक कार्याचा व्यापही कोल्हापूर जिल्ह्यात पसरलेला. ते जिल्हा शेतकरी संघाचे अध्यक्ष, 'कर्मवीर' असा छ. राजाराम महाराजांकडून सन्मान लाभलेले, त्यामुळे क्षात्रजगद्गुरू, रावसाहेब व्ही.टी. पाटील, पी. ए. राणे अशा खानदानी मराठा समाजातील प्रतिष्ठितांचे आमच्या वाड्यात येणेजाणे मी अनुभवत होतो. श्री मौनी विद्यापीठातील दलित वसतिगृह स्थापन करणाऱ्या या आजोबांची मूलतः आध्यात्मिकवृत्ती, स्वामी विवेकानंद मिशनशी संपर्क, दक्षिणेकडच्या रमण महर्षींची भेट अशा अनेक गोष्टी माझ्या स्मृतिपटलावर आजही प्रभावी ठरल्या आहेत.

हेच आजोबा आमच्याकडून समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक पाठांतर करून घेत. गीतेचे श्लोक पाठ करायला लावीत. 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे' हे तर माझ्या मनावर वज्रलेपाप्रमाणे कोरले गेले. अबोध मनावर झालेला हा गहन संस्कार जीवनभर तोच ताजेपणा कसा राखू शकतो हे गूढ रहस्य. शोधता शोधता धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञानाच्या क्षेत्रात बरीच घोडदौड केल्यानंतर मानसशास्त्राचा मी पदवीधर झालो. प्रा. श्रीनिवास दीक्षितांच्याकडे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात पी.एच.डी. पर्यंत मजल मारली आणि एक दिवस आतून उर्मी झाली की दासबोधाचा अभ्यास करायचा.

मध्यंतरीच्या काळात मी आर्य समाजाचे मॉरिशस बेटावरचे संन्यासी स्वामी मुक्तानंद यांच्याकडून गायत्री मंत्राची दीक्षा घेतली होती, नि मी आयुष्यभराचा गायत्री उपासक बनलो त्याला आता अर्धशतक झाले. श्रीदत्ताबाळांच्या संस्थेत सहभागी झालो. त्यावेळी अनेक गायत्री मंत्राची पुरश्चरणे, यज्ञ केले नि माझे जीवन खरोखर उजळून गेले. बंगालच्या आनंदमयी माँ, पाँडेचरीच्या अरविंद आश्रमाच्या माताजी, दिलीप कुमार रॉय, ब्रह्मर्षि दैवरात, रमणाश्रमातील काही थोर साधुसंत यांचे आशीर्वाद लाभले. गोळवलकर गुरुजी, अटलबिहारी बाजपेयी, पटवर्धन बंधू हेही भेटले. त्यासाठी दत्ताबाळांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानावे

लागतील. आणखी एका गोष्टीबद्दल दत्ताबाळांना मी मानतो. नाशिकजवळच्या टाकळी येथे समर्थ रामदासांनी गायत्रीमंत्राचे पुरश्चरण केले. त्याठिकाणी ते मला घेऊन गेले. तेथे आम्ही थोडा वेळ ध्यान केले.

गेल्या वर्षी अचानक अंतःप्रेरणा झाली. नि माझे मित्र अनंत खासबारदारांना मी मोबाईलवर संदेश पाठवला 'मला दासबोध हवा आहे.' अनंतनी संध्याकाळी पोचवलासुद्धा. मग झपाटल्यासारखा त्या डोहात डुंबून गेलो. बालपणापासून फिरणारे समर्थ रामदास नावाचे कालचक्र पूर्ण गोलाकार, पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्णबिंब बनले.

दासबोधावर मी लिहायला घेतले ते कोणाला बरे वाटावे, कोणाला खूश करून शाबासकी मिळवावी असा बालिश हेतूही त्यामागे नाही. ती एक अंतः प्रेरणा आहे. सदसद्विवेक बुद्धी आहे. पूर्वग्रहविरहित, आपलेच मन निर्मळ करण्याची ती निखळ अनुभूती आहे. गायत्री मंत्र आतापर्यंत अर्धशतकात अखंड करू शकलो. जगताना तीन भू, भूवः, स्वः यांना उजळवणाऱ्या आंतरिक सूर्याचीच, प्रकाशदेवतेचीच कृपा. प्रत्येक हिंदूला हे नव्याने सांगण्याची गरज नाही की सुखाचा शोध हा बाह्य जगात करायचा नसून अंतरंगामध्ये करायचा असतो. त्यासाठी गरज असते ती आपली मन-बुद्धी समजून घेणे, तिच्या मर्यादाही समजून घेणे, ती अधिकाधिक विशुद्ध बनवणे. त्यामुळे आंतरिक आणि बाह्य जगाकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोनच बदलून जातो. प्रथम अंतर्मन, बाह्यमन यात बदल व्हावे लागतात आणि मग मानवी वर्तनात बदल होतो. त्यानंतर मनाच्या सुप्त शक्ती म्हणजेच बुद्धीत ज्ञानाचा प्रकाश येतो. बुद्धीचे रूपांतर प्रज्ञा शक्तीत होते. ही सारी प्रक्रिया गायत्री मंत्रामुळे होते, अशी माझी पक्की श्रद्धा आहे. त्यामुळे हे भारतीय मानसशास्त्र प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे.

गायत्री मंत्राचे पुरश्चरण टाकळी गावी करणाऱ्या स्वामी रामदासांची मन-बुद्धी अशीच प्रकाशित झाली असणार यात शंका नाही. असे पुरश्चरण १२ वर्षे करणाऱ्यांचे चारित्र्यही शुद्धच असते यात तीळमात्र शंका नाही. यामुळेच स्वामी रामदासांना मी भारतीय मानसशास्त्रज्ञ म्हणतो. दासबोधातून, मनाच्या श्लोकातून त्यांनी आंतरिक परिवर्तनाची गुरुकिल्लीच दिली आहे. पातंजली

योगसूत्राला भारतीय मानसशास्त्र म्हणतात. तो योगाभ्यास हा अंतिमतः समाधीच्या ध्येयाप्रत साधकाला पोहचवतो.

अलीकडे पातंजली योगाचे मार्केटिंग करणारे मार्केटिंग गुरू उदंड झालेत. यम, नियमाच्या अष्टांग पायऱ्यांचा मार्ग सांगताना यम आणि पायाभूत नियम वगळूनच आसन-प्राणायामाकडे नेण्याची या योगगुरूंना घाई असते पण आचरणाचे यम, नियम पाळले नाहीत, तर उलट योगमार्गात अपयश येईल नि धोकाही संभवतो. असा धोका दासबोध, मनाचे श्लोक, आचरणात आणणाऱ्या साधकामध्ये संभवत नाही.

सध्या एकत्र कुटुंबव्यवस्था जवळजवळ लय पावली आहे. पैसा हे केवळ विनिमयाचे साधन न राहाता सारे जीवनच त्याच्याभोवती फिरते आहे. भौतिक सुख सर्वस्व मानून त्या वेड्या स्पर्धेत प्रत्येक जण धावू लागला आहे. त्यामुळे बाह्य पर्यावरण जसे बिघडले तरी त्याची आपणाला चिंता नाही, तशीच आंतरिक पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे आणि त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत याविषयीही आपण बेफिकीर आहोत. या साऱ्याचा परिणाम शरीरावर व्हायला कितीसा वेळ लागणार ? मग आम्ही मानसोपचार तज्ज्ञापासून ते ऑक्सिजन पार्कपर्यंत विसंबून राहू लागलो आहोत. त्यावर अनेक उत्तम उपायांपैकी मनाचे श्लोक वाचा नि आचरणात आणा हा एक उपाय होय.

## समाजमन

समाज म्हणजे नेमके काय ? काय दाखवाल ? जेथे अनेक व्यक्ती एकत्र येतात, राहतात, व्यवहार करतात तो समूह. समाज म्हणजे एक अमूर्त संकल्पनाच होय. व्यक्ती ही त्या सामुदायिक अस्तित्वाची एक पेशी. समाजमनाचा या पेशीशी अन्योन्य संबंध आहे. बाह्य जगात घडणाऱ्या अनेक नकारात्मक घटनांचे मूळ समाजमनात खदखदणाऱ्या जागृत ज्वालामुखीत असते.

आज सर्वत्र हिंसाचार आढळतो. घरापासून देशापर्यंत तेथून जगभर जागतिक घडामोडींचा आढावा घेतला की मन विषण्णं होते. अशांत होते, दुःखी होते. जीवनाचा जणू तो अविभाज्य भाग बनला आहे, येथे नीतिमत्ताच लयाला गेली. अशी परिस्थिती जगाचा इतिहासात पुनःपुन्हा निर्माण होते. अशा वेळी नैतिक शिक्षणाची गरज आहे. त्याहून अधिक आचरणाची.

मूळात सकारात्मक (Positive Thinking) विचारसरणीची आवश्यकता भासू लागली. मूलतः प्रत्येक माणूस हा चांगलाच असतो. काहीवेळा त्याच्या चांगुलपणावर ढग येतात. हे ढग ढोंगाचे, जातीयतेचे, धर्मांधतेचे असतात. ते कायमचे असतात असे मी म्हणत नाही. ते येतात तसे जातात. कारण परिवर्तन हा जगातील एक शाश्वत नियम आहे.

ज्यांना आंतरिक सत्याचा साक्षात्कार झालेला असतो त्यांच्यावर ही जबाबदारी असते. किंबहुना हे त्यांचे कर्तव्य असते की त्यांनी समाजमनाला क्रियाशील बनवायचं, चालतं चालतं ठेवायचे. पण ते चालणे द्वेषापासून प्रेमाकडे. चालत रहा, चालत रहा, पण आंतरिक दिशेने, जर मी बदललो नाही तर जग बदलण्याचे स्वप्न बाळगण्यात अर्थ नाही. मी स्वतःत बदल घडवला तर मुद्दाम इतरात बदल करावा लागणार नाही. लोक आपणहून बदलतील. तुमचे केवळ सानिध्य, तुमचे आचरण, तुमचे विचार परिवर्तनासाठी पुरेसे आहेत. तुमचा एक शब्दही दिलासा देणारा असेल. तुमचे एक पाऊलही दुःखावर फुंकर घालणारे ठरेल. हे सारे आमूलाग्र परिवर्तन करण्यासाठी तुम्हाला जंगलात, गुंफेत जाण्याची गरज नाही. विद्यमान सभोवताली राहून करता येणे शक्य आहे.

केव्हातरी आयुष्यात गंभीरतेने या आंतरिक परिवर्तनाचा संकल्प करा. मग पाहा आपोआप तशी भावात्मक, सुंदर, आनंददायी परिस्थिती तुमच्या भोवती निर्माण होईल. स्वामी विवेकानंदाचे विचार लक्षात घ्या. Every man is potentially Divine प्रत्येक मनुष्य मूलतः ईश्वर स्वरूपी आहे.

आंतरिक शोध घेताना मानसिक पातळीवर प्रचंड उलथापालथही होईल. कदाचित समुद्रमंथनाप्रमाणे विषही वर येईल, पण खात्री बाळगा ते पचवणारा कैलासपती शिवही तुमच्या जीवाला साथ देत असतो नि तुम्हाला जीवदान मिळते.

मी या छोट्या पुस्तिकेला 'समर्थांचे नैतिकमानसशास्त्र' हे नाव जाणीवपूर्वक दिले आहे. अनेकवेळा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वावरताना असा सूर कानी पडतो की, नीतिशास्त्र ख्रिश्चनधर्मामध्ये आहे. बुद्ध, जैन धर्मात आहे. मात्र हिंदूधर्मात नाही. हा आक्षेप खरा नाही. उपनिषदे, गीता, ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा अशा अनेक तत्त्वज्ञान आणि धर्मग्रंथात पदोपदी नैतिक उपदेश आहे. दासबोध

आणि मनाचे श्लोक यात नीतिशास्त्र अगदी प्रकाशित झाले आहे. जीवनात योग्य दिशेने नेणारी ती नीती. माझ्या डॉक्टरेटनंतर आठ वर्षे एका संशोधनाची व्याप्ती भारताच्या आठ राज्यात नि दोन हजार स्त्री-पुरुषांपर्यंतची होती. पाचशे मुलाखती बत्तीस प्रश्नांचे फॉर्म भरून घेतले. त्याचा निष्कर्ष होता 'नैतिक शिक्षणाची आवश्यकता' आणि ग्रंथाचे शीर्षक आहे 'निधर्मी नैतिकता'. विशिष्ट धर्मात नैतिक शिकवण आहे आणि इतरात नाही असे म्हणायचे कारणच नाही. मुळात नीतीचा उगम अंत:प्रेरणेत आहे.

आता 'समर्थांचे नैतिकमानसशास्त्र' असे म्हणण्याचे कारण पाश्चात्त्य मानसशास्त्रज्ञ डॉ. सिंग्मंड फ्रॉईडचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण रणकंदनात, मानव संहारात असंख्य लोक मानसिक दडपणामुळे मनोविकृत बनले, अनेक मानसिक आजार झाले. त्यांचे मनोविश्लेषण करणाऱ्या मानसशास्त्रज्ञांनी अनेक उपाय शोधले. डॉ. फ्रॉईडना मनोरूग्णांचा अभ्यास करावा लागला. भारतीय योग्यांच्या निरोगी मनाचा अभ्यास करायला वेळ मिळाला नाही. त्यामुळे त्यांचे उपाय भारतीयांना निरूपयोगी ठरतात. त्यासाठी हवा 'दासबोध'. अर्थात दासबोधावर जे मी लिहीले त्यात काही सगळेच नवे आहे असा माझा दावा नाही. त्यावर अनेक मोठमोठ्या लोकांनी लिहिले आहे. त्यावर निरूपण केले आहे. प्रा. के. वि. बेलसरे, ह.भ.प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, श्री नारायणमहाराज रामदासी, गो. नि. दांडेकर अशी नावे आदराने घ्यावी लागतील. गोपाळ नीलकंठ दांडेकर उर्फ आप्पा यांच्याबरोबर दुर्गभ्रमंतीत त्यांचा सहवास मला लाभला. स्मरणगाथेतील संत गाडगेबाबांच्या बरोबरची त्यांची भ्रमंती त्यांच्यातील उच्चकोटीच्या साधकाचे दर्शन घडवते. समर्थांच्यावर त्यांनी लिहिलेले वाचताना ते पदोपदी जाणवते.

मानसशास्त्राचा पदवीधर आणि तत्त्वज्ञान विषयातील डॉक्टरेटमुळे नव्हे तर एक गायत्री उपासक म्हणून मला दासबोधावर लिहावेसे वाटले. गॅरी झुकाव्हच्या Seat of Soul सारख्या ग्रंथाचा अनुवाद करताना, दिपक चोप्रासारख्या भारतीय वंशाच्या प्रसिद्ध लेखकांनी धर्माची मानसशास्त्रीय केलेली मांडणी वाचून मला दासबोध, मनाचे श्लोक यांचे मोल पूर्वीपेक्षाही कितीतरी पट अधिक वाटू

लागले. कस्तुरीमृगाप्रमाणे आमचे झाले आहे. माझ्यापेक्षाही अधिक समर्थपणे लिहिणाऱ्यांनी समर्थ रामदासांना नव्या संदर्भात सादर केले पाहिजे. अर्थात, हे करताना समर्थांना जातिधर्माच्या चौकटीत बंदिस्त नको करायला.

दासबोधातील काही मतभेदाचे मुद्दे बाजूला ठेवून त्यातील अमृतकणांचा आपण जरूर शोध घेऊ शकतो. त्याने जीवनपरिवर्तन होईल. श्री. पू. गोळवलकर गुरुजी, पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींना मी भेटलो होतो. त्यांच्या हृदयाची व्यापकता आम्हाला लाभू दे. एका जमातीने दुसऱ्यावर प्रभुत्व गाजवण्याच्या मानवी मूलभूत प्रेरणेला Power Motive (सत्ता गाजवायची प्रेरणा) म्हणतात. त्याच्या पलीकडे मानव जातीने आता झेपावायची वेळ आली आहे. दासबोधातील नैतिक मानसशास्त्रात ती दैवी ताकद आहे. ती प्रत्येकाला लाभो !

***

**✻ आभार ✻**

**हा छोटा ग्रंथ साकारण्यात मला अनेक सुहृदांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यात श्री. अनंत खासबारदार, उदय जोशी, धनंजय देसाई, अमित गोंडल, शाहू वाचनालय ग्रंथपाल गुरव, राजहंस प्रेस, रमा–कृष्ण ग्राफिक्स या साऱ्यांचा आभारी आहे.**

*– डॉ. सुभाष के. देसाई*

# संत रामदासांचा नीतिबोध

भारतीय संस्कृतीमध्ये नीतिमीमांसा फार मूलभूत, जीवनाला उदात्त स्वरूप देणारी मानली जाते. माणसाचे आध्यात्मिक स्वरूप ज्यांना समजून घ्यायचे असेल त्यांनी माणसाच्या वैज्ञानिक स्वरूपाचे आकलन प्रथम करून घेतले पाहिजे. आधुनिक मानसशास्त्र आपण समजून घेतले तर आपल्या लक्षात येते की, संत रामदासांनी मनाचे श्लोक मध्ये भारतीय मानसशास्त्रच मांडले आहे. आणि दासबोधातून नीतिबोध शिकवला आहे. प्रथम आपण नीतिबोधाचा विचार करू. त्यासाठी नीतिशास्त्र म्हणजे काय आणि संत रामदासांची शिकवण हे नैतिकशास्त्र ठरते का, याचा ऊहापोह करता येणे शक्य आहे. स्वत: संत रामदासांनी स्वत:च्या आयुष्याकडे एक नैतिक बांधिलकी म्हणूनच पाहिले. प्रत्येक कर्म हे सद्‌गुणाचाच आविष्कार असला पाहिजे, ते सद्‌वर्तनचेच असले पाहिजे आणि त्याची परिणीतीही उत्तम झाली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असावा. त्यांच्या ईश्वरीय निष्ठेत कर्मकांडापेक्षा विवेकशक्तीवर अधिक भर होता असे आढळते.

हिंदू धर्मग्रंथामध्ये विशेषत: तत्त्वज्ञानामध्ये असे मानण्याचा प्रघात आहे की, ज्याच्या ठिकाणी नित्यानित्य वस्तुविवेक आहे त्याला अद्वैतानुभूती येऊ शकेल. नित्य काय, अनित्य काय, प्रियकर काय व हितकर काय, साध्य काय, साधन काय, चांगले काय, वाईट काय इत्यादीमधील विवेक सदैव जागा असणाऱ्यालाच अद्वैत प्राप्तीचा अधिकार प्राप्त होऊ शकेल.

स्वामी रामदासांनी यांच्या दासबोधात या विवेकावर अतिशय भर दिला आहे. ते मुळातून अभ्यासण्यासारखे आहे. म्हणून संस्कृतमध्ये एक श्लोक आहे, 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपात: शतमुख: ।।' ज्याचा विवेक भ्रष्ट झाला आहे त्याचे शतमुखांनी अध:पतन होते. आर्य चाणक्याच्या भाषेत, 'माझे इतर काही नुकसान झाले तरी चालेल, पण माझी बुद्धी जाऊ नये, ती शाबूत राहावी.' ''**बुद्धिस्तु मा गान्मम ।**''

नीतिविषयक चर्चेचा केंद्रबिंदू 'मनुष्य' हाच होतो. मी कसे जगावे किंवा मी कोणती कृती करावी यावर मार्गदर्शन संत रामदासांनी केले. त्यांनी व्यावहारिक शहाणपण शिकवले त्यामुळे परस्परविरुद्ध विचार किंवा भावनांचा अतिरेक

टाळून जो मध्यम मार्ग निवडला जातो तो सद्‌गुण समजावा, असा नीतिबोध त्यांनी केला. धैर्याची जशी अनेकवचने करता येत नाहीत पण धैर्याचे विविध प्रकार स्पष्ट करता येतात; त्याप्रमाणे संत रामदासांनी सद्‌गुणी संपन्न वर्तनाचे विविध प्रकार स्पष्ट केले.

## नीतिबोध

नीती मग ती व्यक्तिगत असो वा सामाजिक सद्‌गुण, सद्‌भावना, सदाचार यांचा नीती हाच मानदंड असतो. सद्‌गुणी होणे हेच नैतिक ध्येय संत रामदासांनी दासबोधाच्या पानापानातून मांडले आहे. त्यामुळे नैतिक तत्त्वानुसार आचरण करणे हे सार्वत्रिक ध्येय त्यांनी तत्कालीन समाजापुढे ठेवले. समत्व हेही नीतितत्त्व आहे. किंबहुना कर्तव्यवादी नीतिशास्त्र त्यांचा पाठपुरावा करते.

सर्वसामान्य माणसाला ब्रह्मसूत्रे, वेद, उपनिषदे, गीता वाचायला वेळ घ्यावासा वाटत नाही. किंबहुना त्यातील जटिल सिद्धांत, तत्त्वज्ञान याचा व्यवहारी जगाशी काय संबंध? असाच प्रश्न तो उपस्थित करतो. उलट उपदेशामृत पाजणाऱ्यालाच तो प्रतिप्रश्न करतो की, मी माझे कर्तव्य का करायचे? मी नीतिमान का असावे? भारतीय धर्मपरंपरा असे मानते की, सामाजिक सुसंवाद, समाजधारणा, समाजहित साधले तरच समाजात राहून माणूस स्वतःच्या कल्याणाची साधना करू शकतो. याचा अर्थ व्यक्तिगत कल्याणासाठी समाजहितास जपणे आवश्यक आहे. नीती त्यासाठीचा असते म्हणून नैतिक ध्येय हे जीवनध्येयात (वा परमपुरुषार्थात) समाविष्ट आहे असे म्हणता येईल. त्याचे स्वरूप मानसशास्त्रीय ही आहे नि आंतरिक स्वरूपाचे आहे.

भारतीय संस्कृतीत नीतिमूल्यांची चर्चा अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या आधारे केली जाते. संत रामदास त्याला अपवाद नाहीत. त्यामधील सत्य व अहिंसेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. सत्याचा अर्थ खोटे न बोलणे, खोटेपणाचा व्यवहार न करणे असाही होतो, यावरून असे म्हणता येईल की, वागण्या बोलण्यात, विचार करण्यात स्वतःशी प्रामाणिक राहणे, इतरांशी प्रामाणिक रहाणे.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञ कांटच्या मते धर्म हे नीतिमत्तेचे अधिष्ठान नसून नीतिमत्ता ही धर्माचे अधिष्ठान आहे याचाच अर्थ असा की धर्म कल्पनेशिवाय नीतिमत्ता

स्वतंत्रपणे कार्यरत होते. भारतीय संतांनी नीतिबोध केल्यामुळे धर्माचा पाया मजबूत होतो. जीवन जगण्याची रीत सामर्थ्यवान होते, यात शंका नाही.

## बदलत्या काळातील नीतिमूल्ये

यापूर्वी वेद, उपनिषद, गीता, ब्रह्मसूत्रे, पुराणे, स्मृती यामध्ये आढळणाऱ्या नीतिउपदेशाचा, नीतिबोधाचा विचार करीत होतो. भारतीय स्वातंत्र्यानंतर बदललेल्या काळातील नीतिमूल्य वेगळ्या स्वरूपात नव्या पिढीपुढे आली आहेत. किंबहुना भारतीय राज्यघटना हा नवा स्मृतिग्रंथ बनला आहे. भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकात या नव्या नीतिमूल्यांची ग्वाही भारतीय नागरिकांना देण्यात आली आहे. समताधिष्ठित समाजरचनेत सामाजिक - आर्थिक न्यायास महत्त्व प्राप्त झाले. त्यादृष्टीने स्वातंत्र्य, समता, सामाजिक, आर्थिक, न्याय, बंधुता ही नीतिमूल्ये महत्त्वाची ठरली. त्या साऱ्यांचा केंद्रबिंदू मानवी प्रतिष्ठा असल्याने या नीतिमूल्याला सर्वोच्च महत्त्व प्राप्त झाले. अर्थात संतांनी केलेल्या नीतिबोध हा मानवाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणाराच आहे. त्यादृष्टीतून संत रामदासांचा दासबोध किंवा मनाचे श्लोक हे हिंदूंच्या विविध धर्मग्रंथावरील रसाळ भाष्य जसे आहे तसे स्वानुभवावरही आधारित आहे.

स्वामी रामदासांचा दासबोध हा नीतिबोधच आहे. त्या दृष्टीने विचार केला तर नीतिशास्त्र हे आचरणशास्त्र आहे. माणसाचे आचरण हे तमोगुणाकडून सत्त्वगुणाकडे कसे जावे याचे व्यवहारवादी विवेचन त्यांनी केले आहे. एखाद्या निर्जन बेटावर एक व्यक्ती आहे नि तिचे आचरण हे नैतिक की अनैतिक असे कोणी विचारले तर प्रथम हे स्पष्ट करावे लागते की आचरण हे दुसऱ्या व्यक्तीच्या संदर्भात घडत असते. केवळ एकट्या सुट्या माणसाचे आणि त्याच्यापुरते असे नीतिशास्त्र असणार नाही हे ओघानेच येते. कारण नीतीचा विचार दुसऱ्या व्यक्तीच्या संदर्भात संभवतो. जगात एकच व्यक्ती असेल तर नैतिक प्रश्नच नसेल. नीतीचा उदय होण्यासाठी किमान आणखी एका व्यक्तीच्या अस्तित्वाची गरज आहे हे ओळखूनच स्वामी रामदासांनी हितोपदेश केला, नि तो साऱ्या समाजासाठी केला. मना तू सज्जन बन आणि भक्तिपंथाने वाटचाल करण्याचा संकल्प कर हा त्यांचा संदेश अशासाठी मोलाचा आहे की, संकल्पाचा चांगलेपणा हा नैतिक चांगलेपणा होय. चांगलेपणा हा माणसाच्या स्वभावात असतो, चरित्र्यात असतो, नैतिक महत्त्व त्यालाच आहे.

## ईश्वरमूलक नीतिशास्त्र

स्वामी रामदासांनी दासबोध रचला त्याला ईश्वरमूलक नीतिविचार (Theological Ethics) म्हणता येईल. मी काय करावे अथवा नीतीचे कोणते आचरण करावे या प्रश्नाचे उत्तर ''ईश्वरी आज्ञेच्या अनुसार कृती करीत जा, नीतीच्या बाबत ईश्वरी आज्ञाच प्रमाण होय.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञ कांटसारखे विचारवंत, कर्तव्यवादी नीतीची कल्पना मांडतात. त्यांच्या मते, ईश्वराला बाजूला ठेवून कोणती कृती युक्त आणि कोणती अयुक्त याचा विचार स्वतंत्रपणे म्हणजे नीतीला स्वायत्त मानून केला पाहिजे. पण आपण दासबोधाच्या संदर्भात विचार करताना या विचारसरणीचा विचार करण्याची आवश्यकता नाही. मात्र 'अनैतिक म्हणजे काय ?' हेही समजून घेणे गरजेचे ठरते.

माणसाची प्रवृत्ती अशी असते की, जी गोष्ट स्वत:च्या बाबतीत त्याला पसंत असते ती इतरांच्या बाबतीत नसते. तो स्वत:ला अपवाद करू इच्छितो. ज्या दृष्टीने मी दुसऱ्याच्या आचरणाकडे पाहतो त्याच नि:पक्षपाती दृष्टीने माझ्याही आचरणाकडे पाहावे म्हणजे इतरांचे वागणे अनैतिक वाटणार नाही.

## आत्मदर्शनात नीतीचे स्थान

उपनिषदांच्या काळापासून आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेणे हे व्यक्तीचे परमप्राप्तव्य आहे असे भारतीयांनी मानले आहे. आता साक्षात्कार झाल्यावर माणसाला आणखी काही मिळवायचे राहात नाही. त्याचे जीवन कृतार्थ होते, याविषयी स्वामी रामदासांना संदेह नाही. मनुष्य स्वत:च्या शोध घेत असेल तर नीतीचा प्रश्न येतो कोठे, असा कोणी प्रश्न उपस्थित करू शकेल. अमुक करावे आणि तमुक करू नये असे म्हणण्याचे कारणच उरत नाही. याला संत उत्तर असे देतात की तुमच्या साऱ्याच इच्छा खऱ्या नसतात. त्यातील काही फसव्या असतात. काही तमोगुणी तर काही रजोगुणी असतात. ज्यांना खऱ्याही म्हणता येणार नाही आणि खोट्याही म्हणता येणार नाही अशांना 'माया' असे म्हणतात. तिला अविद्याही म्हणतात. त्यामुळे खरे आत्मदर्शन होत नाही. मायेचा निरास करून आत्मसाक्षात्कार करून घेणे हा परमपुरुषार्थ होय आणि त्यासाठीच सत्संकल्प, सदाचार, आणि नैतिक आचरण आवश्यक बनते.

वेगळ्या भाषेत सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, माझ्या चित्तात काम, क्रोध, मोह, मद. मत्सर यासारख्या विचारांचे प्राबल्य जोपर्यंत असते तोपर्यंत चित्ताची शुद्धी होणार नाही. त्या शुद्धीनंतरच आत्म्याचे प्रतिबिंब चित्तात उमटेल. शुद्ध चित्ताला आत्मदर्शन झाले की चित्तही विलीन पावते. फक्त आत्मतत्त्वच राहाते. अहंकार हेही चित्ताचे मालिन्यच असते. ते आत्मदर्शनाच्या आड येते. नीतीचा सगळा प्रयत्न निरहंकारी वृत्ती जोपासण्यासाठी केला जातो. अहंकाराचा निरास म्हणजेच मायेचा निरास. भासमान मी, मायिक मी ची निर्मिती अहंकारामुळे होते. तो नाहीसा करून खरे आत्मतत्त्वदर्शन घेणे हे नीतीचे परमप्रयोजन होय. चित्तशुद्धीमुळे अज्ञान नाहीसे होते. सदाचारामुळे चित्ताची शुद्धी होते.

आत्मकथेच्या प्रस्तावनेत महात्मा गांधींनी लिहिले आहे, 'वर्षानुवर्षे जे मला मिळवायचे होते ज्याची आस मला लागून राहिली आहे ती गोष्ट म्हणजे आत्मसाक्षात्कार अथवा मोक्ष होय. गौतम बुद्धांनी निर्वाण हा अनुभव आहे आणि आकाशाप्रमाणे तो नित्य आहे असे म्हटले. त्या अनुभवाला धम्मपदात बुद्धांनी '**अमृतं पदम**' (अमृत पदम्) असे म्हटले आहे.

कोणत्या गुणांना सद्गुण म्हणावे, कोणते गुण आपण प्रयत्न पूर्वक संपादन करावेत हा प्रश्न महत्त्वाचा आहे. बीजरूपाने काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या गोष्टी प्रत्येकात असतातच. त्यांना प्रोत्साहन देत राहाणे म्हणजे नैतिक जीवन नव्हे. त्यात काही आत्मलाभही नसतो. जी गुणसंपदा तमोगुणाकडून सत्त्व गुणाकडे नेते. त्या गुणांची वृद्धी करणे हे आपले कर्तव्य आहे. याला नैतिक कर्तव्य असेही म्हणता येईल. काही लोकांच्यामते विवेकाला अनुसरून वागणे म्हणजेच नैतिक जीवन जगणे सद्गुणी जीवन जगणे होय.

वेगवेगळ्या धर्मातही नैतिक शिक्षणावर भर दिला आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये श्रद्धा, आशावाद, दातृत्व, प्रेम, यांना ईश्वराकडे नेणारे सद्गुण म्हटले आहे. भारतीय योगदर्शनात अहिंसा, सत्य, चोरी न करणे, ब्रह्मचर्य आणि असंग्रह या पाच गुणाना महत्त्व दिले आहे. तर जैन धर्मीयांनी अहिंसा, सनृन (सत्य) मधुर बोलणे, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह यांना व्रते म्हटले आहे. गौतम बुद्धांनी पंचशील सांगितले ती पाच शीले म्हणजे (१) प्राणातिपातविरति (कोणाचा प्राण न घेणे), (२) अदत्तादान विरती (जे आपणास कोणी दिले नाही त्याचा स्वीकार न करणे), (३) काममिथ्थाचार

(अवैध कामपूर्तीपासून अलिप्त राहाणे), (४) मृषावादविरति (खोटे न बोलणे), (५) सुरामैरेयप्रमाद स्थानविरति (कोणत्याही प्रकारच्या मद्याचे सेवन न करणे).

भर्तृहरीच्या नीतिशतकात आणि वैराग्यशतकातही सद्‌गुणाचा महत्त्वाच्या याद्या आहेत. एक श्लोक पहा -

१. *विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा ।*
*सदसि वाक्पटुता, युधि विक्रमाः ।।*
*यशासि चाभिरूचिर्व्यसनं श्रुतौ ।*
*प्रकृतिसिद्ध मिदं हि महात्मनाम् ।*

संकटकाळी धैर्य, उत्कर्षकाली क्षमावृत्ती, युद्धामध्ये पराक्रम, कीर्ती व्हावी याविषयी आस्था, विद्याभ्यासाची तळमळ या गोष्टी थोर लोकांच्याठिकाणी निसर्गत:च सिद्ध असतात.

वैराग्य शतकातील भर्तृहरीचाच दुसरा श्लोक पहा -

२. *धैर्यं यस्य पिता क्षमाच जननी*
*शांति श्चिरं गेहिनी*
*सत्यं सूनुरयम् दया च भगिनी*
*भ्राता मनःसंयमः ।।*
*शय्या भूमितलं दिशोपि वयनम्*
*ज्ञानामृतं भोजनम् ।*
*एने यस्य कुटुम्बिनो वद सरवे*
*कस्माद् भयं योगिनः ।।*

धैर्य हा ज्याचा पिता आहे. क्षमाबुद्धी ज्याची माता आहे आणि त्याची पत्नी ही सदैव शांती ही आहे; सत्य भाषण हा त्याचा पुत्र असून दया ही त्याची बहीण आहे. व मनाचा संयम हा त्याचा भाऊ आहे. त्याच्या कुटुंबातील व्यक्ती या प्रकारच्या असल्याने त्याला कशासेच भय संभवत नाही.

***

# जीवन चरित्र

## स्वामी रामदासांचे जीवन चरित्र

**जन्म :** चैत्र शुक्ल नवमी, रविवार १६०८ (शके १५३०)

**निर्वाण :** माघ वद्य नवमी, शनिवार १६८१ (शके १६०३)

'जय जय रघुवीर समर्थ' असे स्वामी रामदासांनी म्हटले, हे ऐकता ऐकता भगवंताचे समर्थ हे विशेषण लोकांनी त्यांना लावले' आणि पुढे तेच रूढ झाले. हा संप्रदाय श्रीराम उपासनेचा संप्रदाय होय. स्वामी रामदासांना उपासना व आदर्शाच्या माध्यमातून समाजात धर्मनिष्ठा, निःस्वार्थीवृत्ती, चारित्र्य, बलोपसना, समाजसंघटन, शौर्य, धैर्य, चातुर्य, परोपकार, ईश्वरभक्ती अशा सद्‌गुणांचे संघटन करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी श्रीराम आणि हनुमंताच्या मंदिरांची स्थापना केली. मठांची उभारणी केली. शिष्यांचा, सज्जनांचा संग्रह केला. महंतांची निवड केली. व्यक्तिमत्त्व विकास व समाजकार्य यासाठी ग्रंथरचना केली. त्यामागे अत्यंत परिश्रम व सातत्य होते. त्यामुळेच त्यांनी पाहिलेले आनंदभुवनाचे स्वप्न साकारले. अखंड कामाच्या लगबगीने व निरंतर दगदगीने श्रमलेला हा सार्थक देह त्यांनी वयाच्या ७४ व्या वर्षी सज्जनगडावर श्रीरामचरणी अर्पण करून चिरविश्रांती घेतली. तो दिवस होता माघ वद्य नवमी इ. स. १६८१.

मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील जांब येथे इ.स. १६०८ मध्ये जन्मलेल्या स्वामी रामदासांच्या ७४ वर्षांच्या जीवनात त्यागच त्याग केलेला आढळतो. नाशिकजवळ टाकळी येथे त्यांनी गायत्री मंत्राचे अनुष्ठान केले. (त्या पवित्र ठिकाणी मी जाऊन आलो. तेथली दुरवस्था पाहून मन खिन्न झाले.) अनुभूति संपन्न बनल्यावर त्यांनी भ्रमंती केली. समाजाचे दर्शन घेतले. समाजमनाचे निरीक्षण, अभ्यास केला. त्याचे प्रतिबिंबही दासबोधात आढळणे स्वाभाविक आहे. तर संत रामदासांनी तमोगुणापासून सत्त्वगुणापर्यंत कसा प्रवास करावा याचे उत्तम मार्गदर्शन केले आहे. वैराग्यप्राप्ती व्हायला हवी, पण त्यासाठी घृणा, तिटकारा, भीती याची आवश्यकता असते असे मानायचे काही कारण नाही.

चोवीस ते छत्तीस वयामध्ये केलेल्या परिभ्रमणामध्ये नाना लोक, नाना पद्धती, विविध संस्कृतिप्रवाह समाजप्रवाह त्यांनी सूक्ष्मतेने अभ्यासले. ते पुन्हा कृष्णातीरी आले. समाजाभिमुख बनून त्यांनी अकरा मारूती मंदिरे आणि मठ स्थापन केले. मिरजेला नवीन मठ स्थापन केला त्यावर वेणाबाईना मुख्य नेमले. दासबोधाचे सहा दशक व चार समास या काळात पूर्ण केले. माणसाचे बोलणे, चालणे, वागणे, लिहिणे, वाचणे, काम करणे सारे काही सुंदर असावे असे त्यांना वाटे. ते स्वत: विवेकशील आणि उद्योगशील होते. अंत:करण करूणामय असल्याने परदु:खाविषयी ते नेहमीच संवेदनशील राहिले आहेत. विवेकाच्या जोरावर माणूस अंतःकरणाने विशाल बनून आत्मज्ञानी बनू शकतो. ही त्यांची जीवन धारणा होती. विवेकाला प्रयत्नाची जोड देऊन तमोगुणापासून सत्त्वगुणापर्यंत कशी वाटचाल करावी याचा उत्तम उपदेश, बोध करून खरा व्यवहारवाद त्यांनी मांडला आहे.

## कोल्हापूरशी रामदासांचे नाते

संत रामदासांची जन्मभूमी जांब, तपोभूमी पंचवटी क्षेत्र, आणि कृष्णातीर हे कार्यक्षेत्र. ते कृष्णातीरी आल्यावर काही दिवसातच करवीरक्षेत्री आले. येथे पराजीपंत बरवे कुलकर्णी राहात होते. ते देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. त्यांनी संत रामदासांचा अनुग्रह घेतला. पूजेच्यावेळी एक दहा वर्षांचा मुलगा उत्साहाने काम करीत होता. या चुणचुणीत मुलगा म्हणजे पराजीपंतांचा भाचा. त्याचे नाव अंबाजी व त्याचा धाकटा भाऊ दत्तात्रय. त्यांचे वडील काशीला तीर्थयात्रेस गेले नि संन्यास घेऊन त्यांनी संसाराचा त्याग केला. त्यामुळे पराजीपंतांकडेच त्यांची बहीण व दोन भाचे राहात होते. संत रामदासांनी 'हा अंबाजी आम्हास द्यावा' असे मागितले. पराजीपंतांनी आपली बहीण रखमाबाईस बोलावून घेतले. त्यांनी आम्हा तिघांनाही अनुग्रह करावा अशी प्रार्थना केली. संत रामदासांनी ती मान्य केली. या मुलांपैकी अंबाजी पुढे कल्याणस्वामी म्हणून प्रसिद्ध झाले. आजन्म ब्रह्मचारी राहून त्यांनी समर्थांची सेवा केली. अंबाजींचे धाकटे बंधू दत्तात्रय यांना संत रामदासांनी चाफळ नजीक डोंगरापलीकडे शिरगाव आहे. तेथल्या मठाचे ते अधिपती बनले मात्र त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला होता. कोल्हापूरचे हे दोन सुपुत्र संत रामदासांच्या कार्याचे महत्त्वाचे आधारस्तंभ बनले याचा अभिमान नि स्मरण करवीरकरांनी अवश्य करावे.

दत्तात्रय स्वामींची वंशावळ अशी - दत्तात्रय - राघव - यशवंत - लक्ष्मण - मनोहर - यशवंत - बापुसाहेब अशी परंपरा असून शिरगावच्या मठाचे बापुसाहेब हे मठाधिपती. त्यांच्याकडे दासबोधाची जी प्रत आहे त्याच्या शेवटी खालील ओळी आहेत.

*''श्री रामदासस्वामींचा सेवक । दत्तात्रय नामे लेखक ।*
*तेणे लिहिला ग्रंथनायक । दासबोध हा ।।१।।*
*शके सोळांसे साहा (१६०६) क्रोधनाम संवत्सरे*
*भाद्रपद मासे शुक्लपक्षे नवमी शुक्रवार तदीनी समाप्त ।*
*शुभं भवतु । श्री रघुनाथार्पण मस्तु।।'*

काही थोर अभ्यासकांच्यामते रामदास स्वामींचा संचार सर्वत्र असे. जेथे ते जात त्या ठिकाणी रात्री ते प्रवचन करीत, निरूपणरूपाने श्रीरामरायाची सेवा करीत. अनेक करुणाष्टके, अभंग, पदे, सवाया, आरत्या त्यांच्या मुखातून निघाल्या. मूळ वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या शिष्यांनी हे लिहून काढले असेल. व शेवटी २०० समासांचा दासबोध करण्याचा संकल्प कायम झाल्यावर स्वामी रामदासांच्या इच्छेनुसार स्फुट समास समाविष्ट करून दासबोधाच्या दोन प्रती झाल्या असतील. अर्थात दासबोध हा संपूर्ण रामदासांचाच याविषयी डोमगांव मठ कल्याणस्वामींची प्रत आणि ग्वाल्हेरच्या आबामहाराजांच्या शिरगांव मठातील दत्तमहाराजांची प्रत या दोन्हीत मतैक्य आहे.

***

**सदा देवकाजी झिजे देह ज्याचा ।**
**सदा रामनामे वदे नित्य वाचा ।**
**स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।**

# भगवत्‌गीता आणि दासबोध

संत ज्ञानेश्वरांनी भगवत्‌गीतेचा अमर संदेश संस्कृत भाषेतून बहुजन समाजाच्या उद्धारासाठी प्राकृत भाषेत अनुवादित केला. त्याच पद्धतीने संत रामदासांनी गीता, ब्रह्मसूत्रे, उपनिषदे यातील तत्त्वज्ञानाच्या स्वरूपातील अवघड वाटणारा बोध, गुरुशिष्यसंवादावाटे दासबोधातून मांडला. ज्ञानेश्वरीप्रमाणे प्रारंभी –

**''श्रीराम ।। ॐ नमोजी गणनायका । सर्वसिद्धिफलदायका ।**
**अज्ञानभ्रांती छेदका । बोधरूपा ।।''**

असे गणपतीला वंदन आणि आवाहनही केले आहे. त्यांच्या गणेश स्मरणांत प्रत्यक्ष गणपती साकार रूपाने श्रोत्यांच्यासमोर नर्तन करीत आहे की काय असा भास होतो. जणू गणेशाचे सगुण रूपातील दर्शन रामदास स्वामींना झाले नि ते त्यांनी दासबोधात शब्दबद्ध केले आहे. सरस्वती ही देवता विद्येची देवता ज्ञानाची अधिष्ठात्री देवता. तिच्या आशीर्वादाने शब्द, अर्थ, ज्ञान भांडार रामदास स्वामींपुढे खुले झाले आहे.

याप्रकारे सद्‌गुरू, संत, श्रोते, कवी, सभा, परमार्थ, नरदेह स्तवन दासबोधा आरंभी केले आहे. त्यावेळेच्या प्रचलित प्रथेप्रमाणे दासबोध ग्रंथ ओवी या गेयछंदात आहे. विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय विषयावरील ओघवत्या भाषेतील निबंधाचे संकलनच आहे. यातील तत्त्वज्ञान हे अद्वैताचे आहे तर संप्रदाय भक्तीचा आहे. स्वामी रामदासांच्या भाषेत

*नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदें वेदांतश्रुती ।*
*आणि मुख्य आत्मप्रचिती । शास्त्रसहित ।*

(हा ग्रंथ उपनिषदे, वेदांत, श्रुती, तसेच इतर ग्रंथांच्या आधारे व मुख्यत: शास्त्रप्रचिती व आत्मप्रचितीच्या आधारे लिहिला गेला.)

*शिवगीता रामगीता । गुरुगीता, गर्भगीता ।*
*उत्तर गीता अवधूतगीता । वेद आणि वेदांत ।।*
*भगवत् गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता ।*

*गणेशगीता यमगीता । उपनिषदे भागवत ।।*
*इत्यादि नाना ग्रंथ । संमतीस बोलिले येथ ।*
*भगवद्‌वाक्ये यथार्थ । निश्चयेशी ।।२०।।*

या विवेचनावरून हे स्पष्ट होते की विविध धर्म ग्रंथांच्या अभ्यासाचे सार किंवा महत्त्वपूर्ण विचारांचे संकलन म्हणजे दासबोध, शिवाय आत्मानुभूतिची सोनेरी किनार त्याला लाभली आहे.

भगवद्गीतेमध्ये सांख्य, कर्म, ज्ञान, ध्यान, ज्ञानविज्ञान, ब्रह्म, राजयोग, विभूती, भक्ती, मोक्ष अशा विविध योगांचे भगवान श्रीकृष्ण-अर्जुन संवादातून ज्ञानबोध साधला आहे.

श्रीकृष्णाने अर्जुनाच्या अज्ञानाचा नाश करून खरे विश्वाचे ज्ञानरूपी दर्शन दिले आहे, जणू गुरूने शिष्याला केलेला बोध आहे, उपदेश आहे. स्वामी रामदासांनी स्वत:ला भगवान कृष्णाचा, भगवान रामाचा दास मानले म्हणून हा दासबोध ठरला. आदि शंकरचार्यांनी अद्वैत सिद्धांत मांडताना ब्रह्मसूत्राची मांडणी केली '**अथा तो ब्रह्मजिज्ञाया । ब्रह्मम् सत्य् जगन् मिथ्या ।।**' अशा ब्रह्मवाक्यातून अद्वैत ब्रह्म म्हणजे काय हे स्पष्ट केले. दासबोधाच्या सहाव्या आणि सातव्या अध्यायात (दशकात) मायोद्भव, मायाब्रह्मनिरूपण, द्वैत कल्पना, बद्धमुक्त निरूपण केले आहे. त्यामुळे दासबोध वाचला, अभ्यासला की हिंदूधर्माच्या महत्त्वपूर्ण विचारांचे सार अभ्यासल्यासारखे होते.

केवळ तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून समाजमनामध्ये परिवर्तन होत नाही हे जाणून क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे, हे त्यांनी आवर्जून सांगितले. तेजस्वी तरुण, तेजस्वी मन घडवणारी संस्कार केंद्रे विविध ठिकाणी करण्यासाठी ११00 केंद्र स्थापली, हे मोठे दूरदृष्टीचे कार्य मानावे लागते. कदाचित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यप्रणालीचे रामदास स्वामींची कार्यपद्धत हे प्रेरणा स्थान असावे.

नवविधा भक्तीचे वर्णन करताना श्रीमद् भागवतात साधन भक्तीचे नऊ प्रकार वर्णन केलेले आहेत. त्यालाच नवविधाभक्ती म्हणतात. गीतेमध्ये या प्रकारांचे वर्णन (१) श्रवण, (२) कीर्तन, (३) स्मरण, (४) पादसेवन, (५) अर्चन, (६) वंदन, (७) दास्य , (८) सख्य, (९) आत्मनिवेदन असे केले आहे.

दासबोधाच्या चौथ्या दशकात याच नवविधा भक्तीचे वर्णन स्वामी रामदासांनी केले आहे, ते म्हणतात -

*नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढे प्रांजळ केले ।*
*कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।*
*योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ।।*

जीवन्मुक्त महापुरुषाकडून ऐकून उपासना करतात, ते श्रवणपरायण भक्त मृत्यू तरून जातात.

मूळ श्लोक असा आहे -

*''श्रवणं कीर्तनं विष्णो: स्मरणं पादसेवनम् ।*
*अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।''*

रामदास स्वामींनी यावर भाष्य करताना म्हटले की, जो मनुष्य निरंतर नामस्मरण करतो, त्याचे शरीरही त्या नामाच्या प्रभावाने पुण्यमय होऊन जाते. रामनामामुळे महादोषांचे उत्तुंग पर्वतही नाश पावतात. पादसेवन भक्ती म्हणजे तुम्ही नाना प्रयोग केले, ज्ञान, भक्ती, कर्मयोगादि अनेक साधने केली, निरनिराळ्या प्रकारे जप-तपादि सायास केले, मोठ्या प्रयत्नाने अनेक विद्यांचा अभ्यास केला, तरी गुरुकृपेमुळे जी प्राप्ती होते, ती दुसऱ्या कशानेही होऊ शकत नाही. अर्चनभक्ती म्हणजे -

*'काया, वाचा मनें । चित्तें वित्ते जीवे प्राणें ।।*
*सद्भावे भगवंत अर्चावे । या नाव अर्चनभक्ती ।।'*

देव, साधु, सज्जन यांना वंदन करणे म्हणजे वंदनभक्ती. नमस्काराने अंगी नम्रता येते, मनातील शंका नाहीशी होते आणि नमस्काराने निरनिराळ्या संतसज्जनांशी मैत्री, सख्य होते. दास्यभक्ती या संकल्पनेतूनच दासबोध हे नाव साकारले. सर्वांचा, आदरसत्कार, पाहुणचार करावा अशी सेवा ही सातवी भक्ती होय. देवाशी परम सख्य करावे, त्याला प्रेमाने बांधून ठेवावे हे आठव्या भक्तीचे लक्षण आहे.

*'सख्य देवाचे तुटेना । प्रीति देवाची विटेना ।।*
*देव कदा पालटेना । शरणागतांसी ।।'*

यानंतरची शेवटची भक्ती म्हणजे आत्मनिवेदन भक्ती -

एकमेव सच्चिदानंद स्वरूपाशिवाय दुसरे साक्षित्व उरत नाही. जेव्हा आत्मानुभव, आत्मप्रचिती येते तेव्हा 'सोहं अस्मि । अहं ब्रह्मास्मि ।।' चा

अनुभव येतो. या स्वानुभवालाच आत्मनिवेदन म्हणतात. या योगे ज्ञानी लोकांना पंचभूतांमध्ये आकाश ! सकळ देवांमध्ये जगदीश' असे दर्शन होते.

## गीता आणि दासबोधातील गुणांचे वर्णन

गीतेच्या दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायात 'निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।' असा उपदेश भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला केला आहे. भोग व ऐश्वर्याचा त्याग करून निष्काम बनण्यासाठी अर्जुनाला तमोगुणापासून - रजोगुण - आणि पुढे सत्त्वगुणाकडे वाटचाल करण्याची दिशा दाखवतात. सत्त्व, रज, तम भावांनी मोहित होऊन त्यातच लिप्त न होता गुणातीत व्हा अशी अपेक्षा आहे. त्यासाठी प्रथम सत्त्व, रज, तम गुणाची लक्षणे समजून घ्यावी लागतात. स्वामी रामदासांनी दशक २, समास ५ मध्ये रजोगुण लक्षण वर्णन केले आहेत. त्यातही ते दोन सूक्ष्मभेद करतात (१) शबल रजोगुण (२) शुद्ध रजोगुण. पहिला भौतिकाकडे वळलेला तर दुसरा पारमार्थिक असतो. रजोगुणी माणूस म्हणतो -

*''कैंचा धर्म कैंचे दान । कैंचा जप कैंचे ध्यान ।*
*विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ।''*

तमोगुण म्हणजे -

*''परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास ।*
*संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ।''*

लोकांना पीडा देण्यात ज्याला संतोष वाटतो, निष्ठुरपणाचा जो हव्यास धरतो आणि संसारासाठी कष्ट करण्यास जो त्रासत नाही तो तमोगुणच जाणावा.

सत्त्वगुणाचे वर्णन करताना रामदास स्वामी सांगतात, 'सत्त्वगुण परमार्थाची शोभा आहे, संत-महंतांचे ते भूषण आहे आणि त्याच्यामुळेच अज्ञानाचा नाश होतो. पुण्याचा मूळ आधार सत्त्वगुणच आहे. सत्त्वगुण अत्यंत सात्त्विक असून तो संसारसागरातून तारून नेणारा आहे. त्याच्या योगानेच ज्ञानमार्गाचा विवेक उत्पन्न होतो. त्यामुळे भगवद्भक्ती प्राप्त होते. सत्त्वगुणामुळेच ज्ञानप्राप्ती होऊन त्यानेच सायुज्यमुक्तीही मिळते.

## विरक्ताने कसे वागावे ?

संसारामध्ये कसे वागावे, काय करावे, काय करू नये, याविषयी मार्गदर्शन मिळते. पण विरक्ताने कसे वागावे, या विषयी मार्गदर्शन, सल्ला देण्याच्या भानगडीत सर्वसामान्य माणसे पडत नाहीत. स्वामी रामदासांनी विरक्ताने कसे वागावे याविषयी उत्तम मार्गदर्शन केले आहे. भगवद्गीतेतले अनासक्त योगावरचे हे भाष्य आहे. स्वामी रामदास म्हणतात,

*'विरक्ते उपाधी करावीं । आणि उदासवृत्ती न सांडावी ।*
*दुराशा जडो नेदावी । कोणयेकविषईं ।'*

विरक्ताने लोकसंग्रह करावा पण स्वतः कोठेही आसक्त होऊ नये. कशाविषयीही भलती आशा कधीही बाळगू नये. त्याने आपले स्वस्वरूपाचे अनुसंधान कधी सुरू देऊ नये. आचारभ्रष्ट कधी होऊ नये आणि पराधीनपणे कुणाचे अंकितही होऊ नये. याशिवाय –

*'कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांत मार्ग ।*
*प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । सकळ जाणावे ।।*
*ध्वनी लक्ष मुद्रा आसने । मंत्र यंत्र विधी विधाने ।*
*नाना मतांचे देखणे । पाहोन सांडावे ।।*
*विरक्ते असावे जगमित्र । विरक्ते असावे स्वतंत्र ।*
*विरक्ते असावे विचित्र । बहुगुणी ।।'*

सर्वांशी मैत्री तरी पूर्ण स्वतंत्र, विविध गुणांनी संपन्न तो असावा. 'विरक्ती' वर्तणूक पुढे अज्ञान, वासना, संस्कार यांनी बद्ध झालेल्या मुमुक्षूला साधकावस्थेपासून सिद्धावस्थेपर्यंत कशी नेते याचे सुरेख वर्णन स्वामी रामदासांनी (दशक ५ समास ७) केले आहे.

रामचरित मानसात लक्ष्मणाला बुद्धतेचे लक्षण सांगताना भगवान म्हणतात, 'मैं अरु मोर तो तैं माया । जेहिं बस कीन्हे जीव निकाया ।' अहंता (मीपणा), ममता (माझेपण) ही आसक्ती हेच मायेचे खरे स्वरूप आहे आणि त्यामुळेच मनुष्य बद्ध होतो. जीव या मायेत बांधला गेला आहे. ह्या बंधनातून मुक्त व्हायचे आहे. ह्यातून बंधमुक्त झाल्याशिवाय स्वरूपाचे ज्ञान होत नाही. अहंता, ममता

माझे स्वरूप नव्हे. त्याग त्याचाच होऊ शकतो जे आपले स्वरूप नाही. जे आपले खरे स्वरूप असते त्याचा त्याग कधी होत नाही.

## गीतेचा १६ वा अध्याय चौथा श्लोक

गीतेमध्ये जगात दोन प्रकारचे शील किंवा चारित्र्य असणारी माणसे असतात ती म्हणजे एक दैवी संपत्ती असणारे व दुसरे आसुरी संपत्ती असणारे. आत्मबुद्धी निर्माण होण्यासाठी दैवी संपत्ती हे कारण ठरते आणि भौतिकवादी, जडवादी दृष्टी निर्माण होण्यास आसुरी संपत्तीचे लोक कारणीभूत होतात. आधुनिक परिभाषेत मांडायचे झाले तर कष्टाचा पैसा नि लुबाडलेला काळा पैसा असे वर्गीकरण करता येईल.

स्वामी रामदासांनी गीतेच्या पुढील श्लोकावर भाष्य केले आहे.

*दंभो दर्पोऽभिमानस्य क्रोधः पौरूष्यमेव च*

*अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदामासुरीम्*

रामदास स्वामी म्हणतात अशा लक्षणाने माणसात जी प्रगट होते ती कुविद्या असते. तो एक प्रकारचा रोगच असतो.

कुविद्येचा माणूस कुरूप असून हीन लक्षणी, अशक्त असतो. दुर्जन, दरिद्री, कंजुष, आळशी, खादाड, फटकून वागणारा आणि अतिशय लबाड असतो. तो अतिशय बोलका, अज्ञानी, अविश्वासी आणि सज्जनांचा द्वेष करणारा असतो. कपटाने बोलणारा, आतल्या गाठीचा, क्षुद्र मनाचा, अंगचोर, पापद्रव्य असलेला, तामसी, आत्मघातकी, विश्वासघातकी असतो.

असे अनेक प्रकारचे दोष त्याच्याठिकाणी असतात. वाईट लक्षणांचे कुविद्येचा माणूस हा कोठारच बनतो. पण रामदासांचा दासबोध हे स्पष्ट करून दाखवतो की, ही कुविद्येची लक्षणे ऐकावी व ती टाकून द्यावी. वाईट लक्षणे सोडणार नाही अशा हट्ट धरणे म्हणजे आत्मघातच होय.

## उत्तम जीवन कसे जगावे ?

कुलक्षणे सोडून जगात जे शाश्वत आहे, कल्याणकारी आहे आणि सर्वांना सुख देणारे आहे त्याच्या नादी माणसाने लागावे. असा आग्रह संत रामदास

धरतात. भगवंताचा शोध हे माणसाचे सर्वोत्तम ध्येय आहे आणि त्यासाठी त्यांनी भक्तिमार्गाचा मार्ग दाखवला आहे. ते म्हणतात,

*''नाना सुकृताचे फळ । तो हा नरदेह केवळ ।*
*त्याहि मधें भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे !*
*भगवद्‌भक्ति हे उत्तम । त्याहि वरी सत्समागम ।*
*काळ सार्थक हाचि परम । लाभ जाणावा ।।''*

***

**श्रोते पुसती कवण ग्रंथ ।**
**काय बोलिले जी येथ ।**
**श्रवण केलियाने प्राप्त ।**
**काय आहे ।।**

**ग्रंथा नाम दासबोध ।**
**गुरुशिष्यांचा संवाद ।**
**येथे बोलिला विशद ।**
**भक्तिमार्ग ।।**

**भक्तिचेनि योगे देव ।**
**निश्चये पावती मानव ।**
**ऐसा आहे अभिप्राव**
**इये ग्रंथी ।।**

# दासबोध - अद्वैतवेदांत

## माया-ब्रह्ममीमांसा

आदि शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रात अथो तो ब्रह्मजिज्ञासा पासून विवेचनाला सुरुवात केली. 'ब्रह्म हेच सत्य जग हे मिथ्या' असे ब्रह्मवाक्यही सांगितले. सारा अद्वैत वेदांत त्यांनी माया - ब्रह्ममीमांसेद्वारे स्पष्ट केला. स्वामी रामदास दशक ६ समास ५ मध्ये सांगतात,

*'ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार ।*
*ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ ।'*

ब्रह्म हे वाणीने वर्णन करता येण्याजोगे नाही तर मायेचे जसे वर्णन करावे तशी ती असते. काळ मायेवर झडप घालतो, तर तो ब्रह्माला स्पर्शही करू शकत नाही. माया पूर्व पद आहे म्हणजे मिथ्या आहे. तर ब्रह्म सिद्धांत आहे. माया अनित्य आहे तर ब्रह्म नित्य आहे. ब्रह्माला हेतू नाही, कर्म नाही, तर माया हेतुयुक्त व कर्ममय आहे.

अवघड अशा ब्रह्मसूत्रांच्या तत्त्वविवेचनाला सोप्या मराठी भाषेतील ओव्यातून स्वामी रामदासांनी दासबोधातून स्पष्टीकरण देऊन सर्वसामान्य श्रोत्यांवर उपकारच केले आहेत असे म्हणावे लागते.

दैनंदिन जीवनातील उदाहरण देताना ते म्हणतात, 'एखाद्या श्रीमंत माणसाकडे उदंड गुप्त धन असते. पण त्याच्या सेवक वर्गाला त्याची जाणीव नसते. त्यांना जे काही बाहेर ऐश्वर्य दिसते तेवढ्याचेच ज्ञान असते. जसे दृश्य जगत् हे मायिक असून ते सगळेच लोक पाहत असतात पण जे विवेकी असतात, ते दृश्याच्या अंतरीचे गुप्त परब्रह्म जाणतात.

*'सद्गुरुकृपा तेचि केली । जेणे बुद्धि प्रकाशली ।*
*द्वैत कपाटे उघडली । येकयरी ।।'*

सद्गुरू हीच ती किल्ली आहे. तिच्यामुळे बुद्धीत आत्मज्ञान प्रकाशते त्यामुळे द्वैताची द्वारे उघडतात. आत्मरूपाशी ऐक्य पावतो. एकदा ब्रह्मसाक्षात्कार

झाला की, भेदाभेद नष्ट होतात. म्हणून स्वामी रामदास दासबोधात सांगतात,

*''उंचनीच नाही परी । राया रंका येकचि सरी ।*
*जाला पुरुष अथवा नारी । येकचि पद ।।*
*ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे । शूद्राचे ब्रह्म ते वोवळे ।*
*ऐसे वेगळे आगळे । तेथे असेचिना ।।*
*सकळासि मिळोत ब्रह्म येक । तेथे नाही हे अनेक ।*
*रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेचि जाती ।।''*

परब्रह्माच्या ठिकाणी उच्च-नीच अथवा राव-रंक, किंवा स्त्री-पुरुष अशी विषमता नाही. ते एकच पद आहे. ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे व शूद्राचे ब्रह्म ते ओवळे असा भेद तेथे असतच नाही. सगळ्यांना मिळून एकच ब्रह्म आहे. त्या ठिकाणी अनेकता नाही. रंक असो वा ब्रह्मादिक असोत, त्या एका ब्रह्माच्या ठिकाणीच जातात.

दासबोधाच्या या भागात अध्यात्मिक एकता, समता, बंधुता 'ब्रह्म' या संकल्पनेत सामावली आहे. जातिभेद, चातुर्वण्य या सामाजिक संकल्पनांना याठिकाणी वाव नाही. 'एकं ब्रह्म द्वितीयं नास्ति' हे श्रुतिवचन स्वामी रामदासांनी स्पष्ट करताना दासबोधात म्हटले आहे की, देहबुद्धीचा अंत होऊन आत्मबुद्धी दृढ झाली की अशा सर्वांना एकाच ब्रह्माची प्राप्ती होते. खरे तर ब्रह्म नामरूपापलीकडे आहे तरी पण त्याला अनेक नावे दिली जातात. उदा. निर्मळ, निश्चळ, निवांत, निजानंद, अरूप, अलक्ष, अगोचर, अच्युत, अनंत, अपरंपार, अदृश्य अतर्क्य, अपार, नादरूप, ज्योतिरूप, चैतन्यरूप, सत्तारूप, साक्षरूप, स्वस्वरूप, शून्य, सनातन, सर्वेश्वर, सर्वज्ञ, सर्वात्मा, जगज्जीवन, सहज, सदोदित, शुद्ध, बुद्ध, सर्वातीत, शाश्वत, शब्दातीत, विशाल, विस्तीर्ण, विश्वंभर, विमल, वस्तू, व्योमाकार, आत्मा, परात्मा, परमेश्वर, परमात्मा, ज्ञानघन, एकरूप, पुरातन, चिद्रुप, चिन्मात्र अशी असंख्य नामे असली तरी '**तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुराण आत्माराम । ते येकाचि परब्रह्म । दुसरे नाही. ।**'

स्वामी रामदासांनी प्रथम जे मिथ्या आहे ते डोळ्यासमोर उभे केले. मग त्याचा खोटेपणा पटवून दिला आणि मग जे सत्य आहे ते अंतःकरणात ठसवले. या क्रमाने ब्रह्मनिरूपण केले आहे, त्यामुळे गहन विषय असूनही तो सर्वसामान्याला रूचेल, पचेल असा ठरला.

ब्रह्माचे विविध प्रकार वर्णन करून तुर्यावस्था, उन्मनी आणि विज्ञान स्पष्ट करताना ते म्हणतात – 'माया, ब्रह्म, आत्मानुभव या सर्वांना साक्षीरूपाने जाणणारी जी स्थिती ती तुर्यावस्था. जेथे साक्षीपणाची वृत्ती विरून जाते ती अवस्था उन्मनी आणि मनाचा लय होऊन जेव्हा पूर्ण जीव-ब्रह्मैक्य होते, जेथे अज्ञान व ज्ञान दोन्ही नसते तेथे परब्रह्माच्या ठिकाणी विज्ञानवृत्ती परब्रह्माशी ऐक्य पावते. अशा ब्रह्मसाक्षात्कारानंतर साधकांपैकी काही मुक्त असतात तर काही नित्यमुक्त तर काही जीवनमुक्त आणि काही योगी विदेहमुक्त असतात. जे मुक्त होऊनही जिवंतपणी जगद्कल्याणासाठी जगात वावरतात त्यांना जीवनमुक्त म्हटले जाते. ज्यांनी मुक्ती लाभल्यावर देहत्याग केलेला असतो त्यांना विदेहमुक्त म्हणतात. या दोघांपेक्षाही जे वेगळे मुक्त पुरुष त्यांना नित्यमुक्त संबोधले जातात. त्यांना योगेश्वर असेही म्हणतात.

काहीवेळा अर्धेकच्चे साधक आपल्या भक्तांना सांगतात की, मी मुक्त आहे तर समजा की तेथे 'मी'पणा आला नि 'मी'पणाची शिळा पोटाशी बांधून भवसागरात तरंगता येत नाही. तसा प्रयत्न करेल तर तो पार पाताळात जाईल, बूडून जाईल.

## बद्धमुक्त

साधकाच्या जीवनात असा प्रसंग येतो की, ब्रह्माविषयी सत्पुरुषाकडून ऐकल्यावर त्याला क्षणभर वाटू लागते की, ब्रह्माशी तदाकार व्हावे. आपण ब्रह्म होऊन राहावे. श्रवणाने मन ब्रह्माकार होते नि काही क्षणातच देहबुद्धी जागी होते. ब्रह्म स्वरूप झाल्यावर संसारात पुन्हा गुंतते आणि सामान्य व्यवहार चालू राहतात. यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की ब्रह्मस्वरूप झालो हे सत्य होते का आभास? हे कसले ब्रह्मरूप होणे ? धड संसार नाही धड परमार्थ नाही ? संसाराच्या आसक्तीने ब्रह्म दूर जाते नि ब्रह्माच्या ओढीने संसाराची वाट लागते. अशा द्विधा मनःस्थितीत असलेल्या, गोंधळलेल्या पार्थ-अर्जुनासारखी अवस्था होते. ती पाहून वेदशास्त्र, पुराणे सांगतात ते विश्वसनीय आहे. ज्ञानी व मुक्त पुरुष देहाने जगात वावरत असता आपली वृत्ती ढळू देत नाहीत. सज्जन माणसाप्रमाणे त्यांची देह कर्मे घडत असतात. त्यात कमी जास्तपणा आढळतो परंतु अंतर्यामी अवस्था स्थिर राहते. मुक्त पुरुषाला ब्रह्मरूपतेवरून ओळखायचे असते.

*बद्ध मुक्त हा संदेहो । धरी कल्पनेचा देहो ।*

*साधु सदा निःसंदेहो । देहणीत वस्तु ।।*

देहाचे भान जोपर्यंत सूक्ष्म का होईना शिल्लक असते, तोपर्यंत साधकाच्या मनात आपण बद्ध की मुक्त असा संदेह कल्पनेमुळे निर्माण होतो. आत्मवस्तू ही देहातीत असते. त्या आत्मवस्तूशी ऐक्य पावून जो देहातीत होतो तो साधू कायमचा निःसंदेह होतो.

ज्यांना आत्मसाक्षात्कार होऊन आत्मज्ञान प्राप्त होते ते सगळेच मुक्त समजावेत. तेच ज्ञान परिपक्व झाले की, आपण मुक्त आहोत ही जाणीव देखील नाहीशी होते.

## ब्रह्मचिंतन हाच राजमार्ग

*अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने ।*

*समस्त जगदाधारमूर्तये ब्रह्मणे नमः ।।*

**अर्थ** : अचिंत्य, अव्यक्तरूप, निर्गुण, गुणात्मा सगळ्या जगताचा आधार अशा ब्रह्ममूर्तीला मी नमस्कार करतो.

या श्लोकाचे निरूपण करताना स्वामी रामदास दासबोधात म्हणतात, 'जे अचिंत्य आहे त्याचे चिंतन कसे करावे ? जे अव्यक्तच आहे त्याचे स्मरण कसे करावे? जे निर्गुण आहे ते कसे ओळखावे ? जे दृष्टीला पडत नाही, जे मनाला सापडत नाही, त्या निर्गुण ब्रह्माला कशा रीतीने पाहता येईल ? जे कशालाच चिकटलेले नाही त्याची संगती कशी धरायची ? जेथे मुळी आधारच नाही तेथे वस्ती कशी करायची ? आणि जेथे शब्द हार खाऊन मागे येतो त्याचे वर्णन कसे करायचे ?

*अचिंत्यासी चिंतू जाता । निर्विकल्पासी कल्पिता ।*

*अद्वैताचे ध्यान करिता । द्वैतचि उठे ।।*

ब्रह्मचिंतन करायला जावे किंवा ब्रह्मध्यान करायला जावे तर द्वैत निर्माण होते. ब्रह्मचिंतनाची सवय जर मनाला लाविली तर कालांतराने ब्रह्मसाक्षात्कार होईल. त्याच्या जोडीला नित्यानित्य विचार ठेवला तर समाधान प्राप्त होईल. दृश्यचिंतन सोडून ब्रह्मचिंतन मनाकडून करवून घ्यावे, हाच राजमार्ग आहे.

स्वामी रामदासांनी आत्मज्ञान प्रतिपादन करणाऱ्या सर्वमान्य ग्रंथांची पुढीलप्रमाणे नावे सांगितली आहेत. ती फार उपयुक्त आहेत. गुरुगीतेमध्ये अद्वैतज्ञानाचा उपदेश आहे. श्री शंकरांनी तो पार्वतीला सांगितला. गोरक्षाला अवधूत गीता सांगितली. त्यात ज्ञानमार्गाचा उपदेश आहे. विष्णूने राजहंसाचे रूप घेतले आणि ब्रह्मदेवाला उपदेश केला. ईश्वराने स्वमुखाने हा उपदेश केला म्हणून त्याला हंसगीता म्हणतात. ब्रह्मदेवाने नारदाला चतुःश्लोकी भागवत सांगितले. व्यासांनी नंतर त्याचाच खूप विस्तार केला. वसिष्ठांनी श्रीरामचंद्राला योगवासिष्ठ सांगितले. श्रीकृष्णांनी अर्जुनाला सप्तश्लोकी गीता सांगितली. असे अनेक ग्रंथ आहेत. त्याचा निष्कर्ष असा की, अद्वैतज्ञान हे खरे आहे असे सर्व स्वानुभवी पुरुषांनी मानले आहे. सगळ्या समस्यांचे मूळ मी पणात सापडते. त्यामुळे आता मी पणाचा त्याग कसा करावा ? हे समजून घेणे गरजेचे ठरते.

## पैलतीर गाठताना

सामान्य लोकांची अशी इच्छा असते की, गंगेसारख्या नदीच्या काठावर आपले शरीर पडावे म्हणजे आपल्याला मुक्ती मिळेल. उत्तरायणात देह पडला तर उत्तम, दक्षिणायनात पडला तर अधम. ह्या संदेहाने सामान्य लोकांच्या मनात भ्रम उत्पन्न होतो. पण स्वामी रामदास सांगतात, की साधू हा निःसंदेह असतो. त्यांना सामान्य माणसाप्रमाणे उत्तरायण, शुक्लपक्ष, घरात दिवा जळत असावा, अंतः काळी भगवंताचे स्मरण राहावे म्हणजे उत्तम गती मिळते असे वाटत नाही. साधुसंत किंवा योगी हे मुळातच पुण्यपुरूष असतात, त्यांनी पापपुण्याला तिलांजली दिलेली असते. ते लोक हे जाणतात की, जिवंत असताना मनुष्य जन्माचे सार्थक करायचे असते. मुळात चांगल्या कर्माचे धान्य पेरले तरच ते उगवून येणार. असे न करता अंतःकाळी भगवंताचे दर्शन होते. अशी चुकीची कल्पना ते लोक करतात. एखाद्या नोकराने धन्याची सेवा न करताच धन्याला म्हणावे की, माझा पगार द्या तर त्याला पगार कसा मिळेल ? त्याप्रमाणे ज्याने कधी भक्ती केली नाही, ईश्वर भजन केले नाही त्याला अंतःकाळी पावन होता येत नसते. जरी लोकांच्या समजुतीप्रमाणे बरे मरण आले तरी भक्ती न केल्याने अधोगती प्राप्त होते. म्हणून जिवंत असतानाच मनुष्य जन्माचे सार्थक करून घ्यायचे असते. दासबोधात सामान्यांच्या देहाचा अंत नि योग्याचा अंत यात फरक स्पष्ट केला आहे.

*'जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचे शरीर पडो रानी ।*

*अथवा पडो स्मशानी । तरी धन्य जाले ।'*

जो ज्ञानी असतो त्याने विवेकाच्या बळावर जन्म-मृत्यूच्या भावनेलाच गिळून टाकलेले असते. विवेकाच्या बळाने त्याला जन्म-मृत्यूचे भानच राहिलेले नसते. स्वामी रामदास अत्यंत कळकळीने सांगतात की, जे खरे साधक आहेत, त्यांना अगत्याने हेच सांगावयाचे आहे की, अद्वैताच्या प्रांजळ निरूपणामुळे साधुसंतांच्याप्रमाणे तुमच्या ठिकाणीही निःसंदेह असे समाधान जरूर बाणेल.

*'जो संतास शरण गेला । तो संतचि होऊन गेला ।*

*इतर जनास उपेगा आला । कृपाळूपणे ।।'*

सत्संगाहून श्रेष्ठ असे काही नाही.

## 'मी'पणाचा त्याग कसा करावा ?

जर मन आत्मवस्तुपर्यंत पोहोचू शकत नसेल तर तेथे कल्पनेचा शिरकाव कसा होणार ? मनाला वस्तुची ओळखच होत नाही. उलट भ्रम मात्र उत्पन्न होतो. मीपणाने मैत्री तुटते. प्रीतीला ओहोटी लागते आणि अंगी अभिमान जणू काय चिकटून बसतो. संशय, कलह, भांडण, भ्रम हे सारे अहंकाराने, मीपणाने निर्माण होतात म्हणून जी व्यक्ती मी पणा सोडून निरभिमान वृत्तीने राहते तिच समाधानी बनते. 'मी'पण सांडून राहे तोचि समाधानी.

'श्रवण' या साधनाद्वारे समाधान प्राप्त होते. त्यामुळे चित्तशुद्धी होते, निश्चयात्मक बुद्धी प्राप्त होते नि मी पणा गळून पडतो. श्रवणाने मनोनिग्रह साधू लागतो. समाधान लाभते. अहंकार नष्ट होतो. त्यामुळे आपोआप कार्यसिद्धी होते व समाधी लाभते. दासबोधात स्वामी रामदास सांगतात -

*'श्रवणे आतुडे भक्ती । श्रवणे उद्भवे विरक्ती ।*

*श्रवणे तुटे आसक्ती । विषयांची ।।*

*श्रवणे घडे चित्तशुद्धी । श्रवणे होय दृढ बुद्धी ।*

*श्रवणे तुटे उपाधी । अभिमानाची ।।'*

ग्रंथ श्रवण करण्याने देखील मी पणाचा त्याग करता येतो. पण जे ग्रंथ प्रापंचिक आहेत, हास्यविनोदी आहेत, शृंगारादी नवरसांनी जे परिपूर्ण आहेत ते ग्रंथ परमार्थी माणसाला हितकारक नाहीत. याउलट ज्या ग्रंथांच्या श्रवणामुळे देहाभिमान नष्ट होतो, धारिष्ट्य उत्पन्न होते, परोपकार घडू लागतो, विषयवासना नष्ट होते तो ग्रंथ श्रवण करावा. त्या प्रयत्नातून साधक पवित्र होतो, त्याला आत्मज्ञान घडते.

हाच विचार दासबोधात पक्षाच्या फार सुंदर उपमेद्वारे स्पष्ट केला आहे.

*नाना फळे पक्षी खाती । तेणेचि तया होये तृप्ति ।*
*परी या चकोराचे चित्ती । अमृत वसे ॥*

निरनिराळ्या प्रकारचे पक्षी नाना प्रकारची फळे खातात व त्यामुळे त्यांची तृप्ती होते पण एक चकोर पक्षी असा आहे की, तो इतर कशाचीच आशा करीत नाही. त्याच्या चित्तात सदैव चंद्रामृताचा ध्यास असतो.

ज्या ग्रंथात आत्मज्ञान असेल तेच श्रवण करावे अन्यथा असे ग्रंथ श्रवण करणे म्हणजे केवळ करमणूकच होय. सारासार विवेक, नित्यानित्य विचार असणाऱ्या ग्रंथामुळेच पैलतीर गाठता येतो.

## मायाविभ्रम

रामदास स्वामीनी मायावाद फार सोप्या भाषेत मांडला आहे.

*'मिथ्या तेंचि जाले सत्य । सत्य तेचि जालें असत्य*
*मायाविभ्रमाचे कृत्य । ऐसे असे पाहता ॥*

जो दृष्य खरे नाही ते आपल्याला खरे वाटते. जे अदृश्य आत्मस्वरूप खरे आहे ते आपल्याला खरे वाटत नाही. विचार केला तर हा सगळा मायेपासून निर्माण होणाऱ्या भ्रमाचा परिणाम आहे असे आढळेल. सत्य प्रत्यक्ष असून झाकले गेले आणि जे सत्य नाही ते मात्र सत्यपणाला चढले ही मायेची करणी आहे. संतसंगतीमुळे, सतत चिंतनामुळे मायेचा परिणाम ध्यानात येतो. ज्ञानी पुरुषाला शरीर असत्यपणे भासते. अंत:काळी भगवंताचे स्मरण होऊन शांतपणे मरण येण्यासाठी जन्मभर अभ्यास करावा लागतो, सत्कर्मे करावी लागतात. साधु स्वानंदामध्ये मग्न असतो देहाच्या सुख, दु:खाशी त्याचा संबंधही नसतो.

शरीराला कष्ट दिल्याखेरीज देवाचे दर्शन होत नाही असा गैरसमज सामान्य माणसांचा होता म्हणून ते वृथा श्रम करतात.

हे अपरंपार विश्व व त्यामधील अनंत प्रकारचे जीवप्राणी ज्याच्या सत्तेमुळे निर्माण होतात व जगतात तो खरा देव होय. देवाच्या सत्तेमुळे सगळे विश्व तगते परंतु स्वत: देव मात्र अदृश्य व नामरूपविरहित आहे, हाच मोठा चमत्कार आहे. देव्हाऱ्यातील देव खरा नाही कारण तो काही सर्व जीवप्राणी निर्माण करू शकत नाही. हे ब्रह्मांड तो उत्पन्न करू शकत नाही.

*देव निर्मिली हे क्षिती । तिचे पोटी पाषाण होती*

*तयासाचे देव म्हणतो । विवेकहीन.*

देवाने ही पृथ्वी निर्माण केली. तिच्या पोटीच दगड होतात आणि विवेकहीन माणसे त्यालाच देव म्हणतात.

मातीची भांडी निर्माण होण्यापूर्वीही कुंभार असतोच. ती मातीची भांडी म्हणजे काही कुंभार नव्हे. तसा देव हा पूर्वीपासूनच आहे, पाषाण नंतर झाले म्हणून तो देव सर्वथा पाषाण नव्हे. म्हणून सृष्टीकर्ता देव हा त्या सृष्टीतील नसतो. ज्याने नाना जीव निर्माण केले तो जीव कसा असेल?

मायेचा त्याग करता यावा म्हणून भगवंतानी गीतेत भक्तिसाधना सांगितली आहे.

## मोक्ष विचार

हिंदू धर्मात कर्मसिद्धांत, पुनर्जन्म याप्रमाणे मोक्षविचाराला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. मोक्ष किंवा मुक्तीचा विचार करताना प्रथम आपण कशापासून तरी मुक्ती चाहतो. म्हणजेच बंधन आहे. शृंखला आहे नि तिच्यापासून आपण मुक्त होऊ इच्छितो. हे बंधन अज्ञानाचे आहे, मायेचे आहे, कर्मबंधनाचे आहे.

रामदास स्वामी म्हणतात, श्रोत्यांना याबाबत अनेक प्रश्न असतात. मोक्ष किती दिवसात मिळतो? मोक्षाला कसे ओळखावे? कोणाला मोक्ष मिळाला असे म्हणावे आणि संतांच्या संगतीने मोक्ष कसा प्राप्त करावा? याचे उत्तर देताना दासबोधात ते सांगतात- रेशमाचा किडा जसा स्वत:ला बांधून घेऊन कोषात

गुरफुटून घेऊन मरून जातो, त्याप्रमाणे अज्ञानी जीव, भगवंताचे ज्ञान नसल्याने आपले जन्ममरण काही सुटत नाही असे म्हणत राहतो. आपण जे आता दान करू जे पुढील जन्मी शतपटीने मिळेल अशी कल्पना जो करतो तो अज्ञानी व बद्ध जाणावा. हे मात्र निश्चित की, या जगात नरदेह परम दुर्लभ होय. तो सुदृढ होडीसारखा असून गुरुदेव हे त्यांचे कर्णधार आहेत, भगवंताची कृपा हा अनुकूल वाहणारा वारा आहे. हे सर्व लाभूनही जो मनुष्य भवसागर तरून जात नाही तो आत्मघातकी जाणावा.

**मूळ श्लोक :** *आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।।*

आपणच आपले बंधू व आपणच आपले शत्रू असतो.

आपल्याच संकल्पाने बंधन उत्पन्न होते व आपणच आपले शत्रू होऊन राहातो हे बंध संतसंगतीने तुटतात.

आपण म्हणजेच ती वस्तूच आहे. 'तत्त्वमसि' हे महावाक्य आहे. साधू आपल्या मुखाने याच महावाक्याचे स्पष्टीकरण करतात. अज्ञानरूपी रात्रीचा शेवट झाला की संकल्पाने निर्माण झालेली दुःखे नाहीशी होतात आणि त्यायोगे तात्काळ मोक्षाची प्राप्ती होते. जागृती हेच स्वप्नातील बंधन तोडायला साधन आले.

*'स्वप्नामध्ये जो बांधला । तो जागृतीने मोकळा केला ।*

*ज्ञानविवेक प्राणीयाला । मोक्षप्राप्ती'*

संकल्पाने बांधलेल्या जिवास विवेकाशिवाय दुसरे कोणी सोडवू शकत नाही. आत्म्याच्या ठिकाणी बंध, मोक्ष दोन्हीही नाहीत. जन्ममृत्यू या गोष्टी आत्म्याच्या ठिकाणी घडत नाहीत.

## आत्मदर्शन

परमेश्वराचे स्वरूप वर्णन करताना रामदास स्वामी म्हणतात,

**जन्म नाही मृत्यू नाही । येणे नाही जाणे नाही**

**बद्ध मोक्ष दोनी नाही । परमात्म्यासी**

**परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार ।**

**परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा**

**ऐसी परमात्म्याची स्थिती । बोलताती वेद श्रुती ।**
**परमात्मा पाविजे भक्ती । येथे संशय नाही**

रामदास स्वामीनी काढलेला हा निष्कर्ष असे सांगतो की, तुम्ही वेद, श्रुती, उपनिषदे, गीता असे अनेक धर्म ग्रंथ अभ्यासले, मुखोद्गत केलेत तरी त्या साऱ्याचा अर्थ इतकाच की, भक्तीशिवाय परमात्मा मिळणार नाही, परमात्म्याचे दर्शन होणार नाही, आत्मदर्शन होणार नाही. नवविधा भक्तीमुळेच भक्त पावन होतो. त्यात आत्मनिवेदन सर्वांत श्रेष्ठ मानले गेले आहे.

आता प्रश्न पडतो की आत्मनिवेदन म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यापूर्वी मी कोण याचा शोध घ्यावा. देव कसा आहे. भक्त कोणास म्हणावे याचे चिंतन करीत गेले, शोध घेत गेले की आपोआप आत्मनिवेदन होते. त्यातून आपोआप देव आणि भक्त यांचे ऐक्य होते, तिला अभेद भक्ती म्हणतात. तिचे दुसरे नाव सायुज्यमुक्ती होय.

दासबोधात स्वामी पुढची पायरी सांगतात-

***सोहं आत्मा स्वानंद धन । अजन्मा तो तूचि जाण***

सोहं म्हणजेच स्वानंदघन आत्मा, तोच तूच आहेस हे जाणावे, शास्त्रप्रचिती, गुरूप्रचिती, आणि आत्मप्रचिती या तीन प्रचिती अखेर एकच कशा आहेत हे स्वतःच्या अनुभवाने ओळखावे. आत्मदर्शन घडले असता आपले हरवलेले आपणास परत मिळते. ध्यानधारणा, कल्पना, देहबुद्धी विराम पावते. मी परब्रह्मस्वरूप आहे असा साक्षात्कार झाल्यावर द्वैत विरून जाते. उपाधीरूप असलेले सारे नाहीसे होते. केवळ आत्मस्वरूप तेवढे शिल्लक रहाते.

मी आत्माच आहे असे ज्ञान ज्या पुरुषास होते त्याला सिद्धपुरुष म्हणतात. त्याचे लक्षण कोणते याचा विचार आता करायला हवा.

## सिद्ध कोणाला म्हणावे ? तो कसा ओळखावा ?

अंतर्यामी स्वरूपाशी समरस असून बाहेर सर्वसामान्याप्रमाणे वर्तन करणारा तो सिद्ध होय.

सिद्ध म्हणजे स्वरूप जाण । तेथे पाहता वेगळेपण मुळीच नाही.

*स्वरूप होऊन राहिजे । तया नाव सिद्ध बोलिजे*

*सिद्ध स्वरूपीच साजे । सिद्धपण.*

आत्मदर्शी व्यक्तीची अवस्था वर्णन करताना रामदास स्वामी म्हणतात त्याच्या अनुभवात द्वैत नसते. पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष दोन्ही स्वरूपात विलीन होतात. तेथे ध्यान आणि धारणा थांबते. कल्पना निर्विकल्प स्वरूपात विरून जाते आणि केवळ शुद्ध जाणीवमय, अत्यंत सूक्ष्म ब्रह्मस्वरूप तेवढे शिल्लक राहाते. मन असते तोपर्यंत ध्यान व धारणा जरूर राहाते. पण साधकावस्था संपून मनातीत झाल्यावर मन उन्मत्त होते. मग धारणा, ध्यान, कल्पना इत्यादी गोष्टी आपोआप विराम पावतात. मी पणाचे बंधन तुटते. जन्ममरणाच्या दु:खातून सुटका होते. आसक्ती नाहीशी होते. 'मी देह आहे' ही संकुचित भावना नाहीशी होते.

बुद्धी स्वरूपाच्या ठिकाणी जडल्याने सर्व उपाधी नष्ट पावतात. त्यामुळे साधू हा निरुपाधिक बनतो. स्वरूप नि:संग असते. त्यामुळे साधूही नि:संग होतो, म्हणून तो मानापमानाचा विचारच करीत नाही. मायेचा मळ स्वरूपाच्या ठिकाणी नसतो. म्हणून साधूही निर्मळ असतात. त्याचा अर्थ असा की साधू हा निरूपाधिक, निसंग, निर्मळ अशा गुणांनी युक्त होतो. अशा साधूची संगत धरली म्हणजे आपोआप स्वरूपस्थिती प्राप्त होते. संतसंगत व संतवाणीचे श्रवण यामुळे अवगुण नष्ट होतात. पण रामदासांनी याठिकाणी याचीही जाणीव दिलेली आहे की, सर्वांचा अनुभव एकसारखा नसतो. कोण कोण कुठल्या प्रकारे राहतात. त्यांना काय अनुभव येतात याकडेही लक्ष द्यायला हवे.

*कोण स्थितीने राहातो । कैसा अनुभव पाहतो ।*

*रामदास म्हणे श्रोतो । अवधान देणे*

अनेकांची अनेक मते, अनेक दृष्टिकोन, अनेक उद्देश, अनेक अनुभव त्यामुळे या गदारोळात माणूस अधिकाधिक गोंधळून जातो. रामदास स्वामी याचा निष्कर्ष सांगतात-

*'भिन्नपणे अनुभविले । तयास सुन्य ऐसे बोलिले.*

## पिंडी ते ब्रह्मांडी

शास्त्रामध्ये पिंडी ते ब्रह्मांडी या प्रकारचे वर्णन आहे हे खरे, पण याची प्रचिती कशी घ्यावी ? प्रचिती घेण्याचा प्रयत्न केला तर सर्व गोंधळ होतो.

*आवघे आंधळेचि मिळाले । तेथे डोळ्याचे काम चाले ।*

*अनुभवाचे नेत्र गेले । तेथे अंधकार ।*

जेथे सर्व आंधळेच जमलेले असतात, तेथे डोळ्याचे काय चालणार? अनुभवाचे नेत्र नसले की सर्वत्र अंधकारच भासणार,

रामदास स्वामीनी एक परखड सत्य जगापुढे मांडले आहे.

*कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पना मात्र*

*देव नाही स्वतंत्र । मंत्राधेन*

निरनिराळ्या लोकांनी कल्पना करून मंत्र निर्माण केले. त्याप्रमाणेच देवही कल्पनेने निर्मिले. ते देव स्वतंत्र नसतात, तर मंत्राच्या अधीन असतात.

*ब्रह्माने निर्मिले । ब्रह्मयास कोणे निर्माण केले*

*विष्णूने विश्व पाळिले । विष्णूस पाळिता कवयु ।।*

*रुद्र विश्व संव्हारकर्ता । परी कोण रुद्राय संव्हारिता ।*

*कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे*

ब्रह्मदेवाने हे सारे विश्व निर्माण केले असे म्हटले तर त्या ब्रह्मदेवाला कोणी निर्माण केले असा प्रश्न येतो. विष्णू विश्वाचा सांभाळ करतो असे म्हटले तर त्या विष्णूला कोण सांभाळतो हा प्रश्न येतो. रुद्र किंवा शंकर विश्वाचा संहार करतो असे म्हटले तर त्या रुद्राचा संहार कोण करतो हा प्रश्न येतो. काळ सगळ्यांचे नियमन करतो असे म्हटले तर त्या काळाचा नियंता कोण असा प्रश्न येतो. या प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत तोपर्यंत संपूर्ण अज्ञानाचा अंधार आहे हे ओळखून राहावे.

त्याचप्रमाणे जे पिंडी ते ब्रह्मांडी हे खरे मानायचे तर अनेक प्रश्न उपस्थित होतात. उदा. खरेच ब्रह्मांड हे पिंडासारखे आहे काय? या कल्पनेचा प्रत्यक्ष अनुभव कोणाला येत नाही. ब्रह्मांडामध्ये असंख्य पदार्थ आहेत, ते सगळे पिंडामध्ये

असणे शक्य नाही. म्हणून पिंडब्रह्मांडाची रचना एकसारखी आहे असे उगीच बोलू नये. कारण जे बोलतो ते तर्काने खरे ठरत नाही. म्हणून याबाबतीत उगीच कल्पना करण्यात अर्थ नाही. इतके विवेचन केल्यावर रामदास स्वामी शेवटी सांगतात, याचा अर्थ असा की, हे सारे विश्व पांच महाभूतांचे बनलेले आहे. पिंड देखील त्याच पांच महाभूतांचा बनलेला आहे. याचा रोकडा अनुभव कोणीही घ्यावा. *(दशक ९ वा समास ५ वा)*

## महंत कोणाला म्हणावे ?

समाजात आपण अनेकवेळा साधु, संत, महंत, संन्यासी, बैरागी असे धार्मिक वर्गीकरण करतो, पण कोणाला काय म्हणून संबोधावे याचे ज्ञान आपल्यापाशी नसते. विशेषत: महंत हा शब्द काळोखात जवळजवळ लुप्त होत चालला आहे. रामदास स्वामीनी अतिशय मोजक्या शब्दात महंत कोणाला म्हणावे? या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. ते दासबोधात सांगतात-

'जो महंत असेल त्याने शुद्ध लिहावे, नीटनेटके लिहावे, लिहून झाल्यावर त्यातील अशुद्ध शोधून काढून ते शुद्ध करावे. त्यानंतर शुद्ध उच्चारून ते वाचावे. चुको नये. विस्कळित काना-मात्रा तपासून व्यवस्थित कराव्यात. लिहिताना कथा-प्रसंगाच्या अनुरोधाने मध्ये रंगवलेली सुंदर चित्रे मधूनमधून वापरावीत. ज्याला जे सांगायचे ते नीट सांगता आले पाहिजे. ही महंत बनण्याची पहिली कसोटी आहे. महंताला हरिकथळा, अध्यात्मनिरूपण चांगल्याप्रकारे करता आले पाहिजे. प्रश्नकर्त्यांचे समाधान करता आले पाहिजे. भविष्याचा त्याला मागोवा घेता आला पाहिजे. अशा प्रकारे जो सर्व गोष्टी जाणतो तोच बुद्धिमान महंत होय.'

ज्याला काळ-वेळ याचे भान असते, प्रबंध, काव्य, सुभाषिते यात प्रवीण असतो. ग्रंथातील सार जाणतो. स्वत: एखादी विद्या, कला शिकून मग लोकांना शिकवतो. असा महंत विवेकाच्या बळावर मायेत गुरफटलेल्या लोकांना सोडवू शकतो. त्याचे

***अक्षर सुंदर, वाचणे सुंदर । बोलणे सुंदर, चालणे सुंदर***
***भक्ती ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ।***

खरा महंत कठीण प्रसंगी धैर्याने उभा राहतो. धीटपणे आल्या प्रसंगाला तोंड देतो. तो लोकसंग्रहही करू शकतो. आणि त्याचवेळी स्वत:स त्यापासून

अलिप्त कसे राखावे हेही जाणतो. लोकांना नाना प्रकारे शहाणे करून सोडतो. अनेक विद्यांचे विवरण तो करतो. तो न्यायनीतीने वागतो. स्वत: कधी अन्याय करीत नाही अथवा दुसऱ्याकडूनही करवीत नाही. कठीणप्रसंगी काय उपाय योजावेत हेही तो जाणतो. रामदास स्वामी शेवटी सांगतात.-

*ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा*

## रामदासांचा व्यवहारी उपदेश

दासबोधाच्या पूर्वार्धात सैद्धांतिक मांडणी रामदास स्वामींनी उत्तमरित्या केली आहे आणि तितक्याच समर्थपणे उत्तरार्धात व्यवहार कसा करावा हे समजून सांगितले आहे. मानवी जीवनाची दोन्ही अंगे प्रपंच आणि परमार्थ. या दोन्ही अंगांची समतोल वाढ झाली तरच जीवनाला सौंदर्य लाभते. सुंदर जीवनच यशस्वी, कृतार्थ जीवन बनते. नियम, शिस्त जर जीवनात असेल तरच ते यशस्वी ठरते. रामदास स्वामींनी जे नियम, जी शिस्त काही शतकापूर्वी सांगितली ती आजही आपण व्यवहारात अंगी बाणावू शकतो. ते नियम सारांश रूपाने असे आहेत.

१. जीवन यशस्वी होण्यास प्रपंच आणि परमार्थ दोन्ही पाहिजेत.

२. आळसासारखा शत्रू नाही त्यामुळे अपरंपार नुकसान होते.

३. सकाळी लवकर उठावे .

४. सकाळी आत्मचिंतन करावे.

५. सकाळी पाठांतर करावे.

६. गोड वाणीने लोकांना खूष ठेवावे.

७. आपल्या व्यवसायामध्ये जागृत असावे.

८. आपल्या कष्टावर उपजीविका करावी, समाजाचे फुकट खाऊ नये.

९. आपल्या व्यवहाराचे उत्तम ज्ञान असावे.

१०. ग्रंथ वाचन व त्यावर मनन करावे.

११. अडचणीत सापडलेल्या माणसांना मदत करावी.

१२. दुसऱ्यासाठी शरीर थोडेतरी कष्टवावे.

१३. भगवंताचे आपण विश्वस्त आहोत या भावनेत प्रपंच करावा.

१४. प्रपंचामध्ये उपजीविकेसाठी पैसा अवश्य संग्रही ठेवावा.

१५. परमार्थामध्ये आत्मशोध, आत्मचिंतन करावे.

नरदेहाचे महत्त्व ओळखून वृद्धपण येण्याच्या आधीच जीवनाचे सार्थक करून घ्यावे. विवेकपूर्ण आचरणाने जीवनात यशस्वी व्हावे. त्यामुळे इहलोक आणि परलोक दोन्हीकडेही मानव यशस्वी होतो. कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचा समन्वय साधल्याने माणसाला आत्मसाक्षात्कार घडतो, त्याला संपूर्ण समाधान लाभते व ते कायम टिकते, हेच परमार्थाचे साधन असल्याने नेहमी त्याचे श्रवण करावे. तत् त्वम असि । अहम् ब्रह्म आस्मि यांना तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात महावाक्ये म्हणतात. ते तत्त्व तूच आहेस.

मी ब्रह्मस्वरूप आहे याचा साक्षात्कार हे मानवी जीवनाचे सर्वोत्तम ध्येय आहे. सचोटीने प्रपंच केला तर हे ध्येय गाठता येते हाच दासबोधाचा संदेश आहे. आणि तो अत्यंत व्यवहारवादी आहे.

## काव्य, कवित्व कसे असावे?

काही शतके लोटली. मराठी साहित्यात अनेक नवनवे प्रवाह आले. पण रामदास स्वामीनी केलेले कवित्वाच्या स्वरूपाचे निरूपण आजही ताजे, टवटवीत आहे नि मार्गदर्शकपरही आहे. ते म्हणतात–

**'कवित्व शब्दसुमनमाळा'**

अर्थ परिमळ आगळा

कवित्व म्हणजे शब्दरूपी फुलांची माळा. त्या फुलांचा सुगंध म्हणजे कवितेचा अर्थ होय. संतरूपी भोंगे त्याकडे आकृष्ट होतात. ते त्या फुलावर बसतात नि त्यांना फार आनंद होतो. अशा शब्दरूपी फुलांची माळा अंत:करणात गुंफावी आणि ती आत्मारामाला अर्पण करावी.

सर्व शब्दांचे मूळ ओंकार होय. त्यालाच शब्दब्रह्म म्हणतात. निर्मळ स्फूर्तिरूपी परावाणी तेथे अखंड वास करीत असते. ती स्फूर्ती अर्थाचे रूप धारण करते. मग तिला पश्यंति म्हणतात. अर्थ जेव्हा सूक्ष्म शब्दांचे रूप

धारण करतात तेव्हां सूक्ष्म शब्दात त्यांचे रूपांतर होते तेव्हां तिलाच वैखरी म्हणतात.

रामदास स्वामी उपदेश करतात की जनतेचे कल्याण व्हावे यासाठी जरूर काव्य करा. भक्ती, ज्ञान, वैराग्य वाढावे यासाठी काव्य करा पण शृंगार, वीर, हास्य, पश्चात्ताप, कौतुक, विनोद या विषयाच्या काव्याला दुय्यम स्थान द्यावे.

कविता कशी असू नये यावरही रामदास स्वामींचे भाष्य खूपच उद्‌बोधक आहे. ते म्हणतात, कविता उद्धट वा पाखंडी नसावी. पाल्हाळ वा पाचकट नसावी. हलक्या दर्जाचे कवित्व नसावे. काव्यशास्त्राचे नियम पाळावेत. ते मोडणारे कवित्व असू नये. छंद, मात्रा, वृत्त चे नियम मोडू नयेत. ज्या काव्यात भक्ती नाही ते अडाणी समजावे. भक्तीशिवाय काव्य म्हणजे मनोरंजनच. ते म्हणजे खोट्या अहंकारातून निर्माण झालेले शब्द होत.

भगवंताची शक्ती सरस्वतीच्या रूपाने म्हणजे वाणीच्या रूपाने अवतरली आहे. या पवित्र शक्तीचा खरा उपयोग आपण भगवत् दर्शनासाठी केला पाहिजे. वाणीचे इतर उपयोग गौण आहेत. खरी कविता संतांच्या हृदयरूपी गुंफेतून वाहत असते. तीच खरी प्रासादिक कविता होय.

उत्तम कविता निर्मळ, रसाळ मागचा पुढचा संदर्भ स्पष्ट करणारी असावी. मन प्रसन्न करणारी व गोड असावी. समजायला सोपी असावी तशीच ती अंगाने लहान असावी. कविता मृदू, मंजूळ, कोमल, तशीच भव्य, अद्‌भुत, विशाल पण व्यवस्थित रचलेली असावी. उत्तम कवितेत पुढील गोष्टी रामदास स्वामींना अपेक्षित आहेत.

अक्षरबंध, पदबंध म्हणजे चित्रकाव्य, नाना चतुर रचना, उत्तम छंद, बंध, घाटी, मुद्रा अनेक प्रकारचे उचित उपाय, चांगले विचार, सुंदर कलाप्रकार, लहानमोठ्या सिद्धी, नाना कार्यकारणभाव, वेगवेगळे छंद, नाना तऱ्हेची माहिती, निरनिराळे दृष्टांत, तर्कप्रकार, कथा, कहाण्या, अनेक आधारवचने, पूर्व पक्षासह सिद्धांत, अनेक प्रकारच्या अवस्थांचे वर्णन, भिन्नभिन्न क्षेत्रातील विद्वत्ता, कल्पना व स्फूर्ती यांचे निरनिराळे प्रकार, अनेक तऱ्हेच्या धारणा आणि धैर्याचे प्रकार अशा प्रकारे अनेक गोष्टींचा समावेश ज्यात आढळतो ती उत्तम कविता होय. उत्तम कवितेमध्ये शंका, कुशंका व आशंका मांडून त्यांना उत्तर देऊन निरसन केलेले असावे. अनेक काव्यग्रंथ आणि शास्त्रग्रंथ यांच्या वचनांचा आधार देऊन निश्चित

निर्णय करावा आणि अशारीतीने संशय मोडून टाकावे.

रामदास स्वामी ज्ञानाचा आविष्कार कवितेतून होताना ती ज्ञानगंगा आत्म ज्ञानाकडे वळवायची आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे उत्तम काव्यामुळे जे लाभते ते काय? याचे उत्तर ते देतात. अनुताप उत्पन्न होतो. अनेक शंकांचे निरसन होते. स्वार्थी जीवनाची लाज वाटते. ज्ञानाचा उत्कर्ष होतो. भक्तिमार्ग म्हणजे काय हे समजते. सद्बुद्धी अंगी जडते. आत्मानात्मविवेक जागा होतो. सगळा भेद नाहीसा होतो. जिवाचे समाधान होते. संसाराचे बंधन तुटते. थोडक्यात ज्या कवितेला संत मान्यता देतात ती कविता उत्तम समजावी.

## कीर्तन रंगी रंगला

रामदास स्वामींनी दासबोधात ओव्या करताना आपले वेगळे कौशल्य दाखवले आहे. ज्ञ सोडून बाकी ३५ व्यंजनाची आद्याक्षरे क्रमाने योजून ओव्या केल्या आहेत. सुरुवातीची ओवी 'क' पासून सुरू केली.

***कलयुगी कीर्तन करावे । केवळ कोमल कुशल गावे***
***कठीण कर्कश कुर्टे सांडावे । येकीकडे ।।१।।***

कलियुगात कीर्तन जरूर करावे, पण केवळ कोमल आणि कुशलतेने गावे. कठोर, कर्कश आणि किरट्या आवाजात गाऊ नये.

चौदाव्या दशकातील समास ४ मध्ये शेवटची ओवी 'क्ष' पासून सुरू केली.

***क्षेत्र क्षेत्रज्ञ क्षोभतो । क्षमते क्षमून क्षमवितो ।***
***क्षमणे क्षोभणे क्षेत्रज्ञ तो । सर्वां ठाई ।।३५।।***

शरीरात जो अंतरात्मा असतो, तो एखादे वेळी शोभतो, तर एखादे वेळी क्षमाशील होऊन सर्वांना शांतवतो. याप्रमाणे कधी क्षोभणारा, कधी क्षमा करणारा असा अंतरात्मा सर्वांच्याच हृदयात राहत असतो. या पहिल्या ते पस्तिसाव्या ओव्यामध्ये कीर्तन कसे करावे ? त्यात चुका कशा टाळाव्यात, भांडणतंटा का सोडावा व भावपूर्ण रसाळ कीर्तन करून श्रोत्यांची मने कशी जिंकावीत याचे अत्यंत समर्थ मार्गदर्शन त्यांनी केले आहे. ते सांगतात भांडणतंटा सोडून द्यावा. दुष्टाशी खळखळ म्हणजे विरोध करू नये. खऱ्या खोट्याने वृत्ती खवळू देऊ नये. अभिमानाने कीर्तन गाऊ नये. घसा खाकरणे, ओरडणे, अंगात आल्यासारखे

उगीच घुमू नये. लबाडी नि चावट लोकांना चाळवू नये. अंत:करण दुखावेल असे चुरचुरीत बोलू नये. कीर्तन करण्याची टाळाटाळ करू नये.

कीर्तनकार नीटनेटका, सुसंस्कृत, चतुर असावा. नम्रता व सद्गुण जोपासणारा असावा. भावपूर्ण, रसाळ किर्तनाने पाप दूर पळून जाते. पुण्य प्रगट होते. कीर्तन आवडल्याने त्यांना कीर्तनाची चटक लागते आणि परत परत ते ऐकावेसे वाटते. रत्नपारखी चांगल्या रत्नामागे धावतात तसेच जेथे सुश्राव्य कीर्तन होते तिथे जाणकार लोक आपणहून धावत येतात.

## हरिकथा कशी रंगवावी

हरिकथा सगुण ईश्वराच्या ठिकाणी भाव ठेवून देवाच्या वैभवाचे व महात्म्याचे नाना प्रकारे वर्णन हरिकथेत करावे. लोकलाज, भीड, द्रव्याचा मोह न धरता कीर्तनात नित्य नवी आख्याने रंगवावीत. नम्रतेने देवळातील सभामंडपात नि:शंकपणे देवापुढे लोटांगण घालावं. हातांनी टाळी वाजवत आणि मुखाने नामघोष करीत नाचावे. ज्या देवापुढे कीर्तन करायचे त्याच देवाची चरित्रकथा कीर्तनात वर्णन करावी.

पण समजा श्रोते साधु जन आहेत, कीर्तन करताना सगुण मूर्ती नसेल तर अद्वैताचे निरूपण अवश्य करावे. वैराग्य बोलावे. नवऱ्याचे वर्णन करावे लागले तरी स्त्री सौंदर्य, त्यांचे हावभाव, शृंगार रस कीर्तनात मांडू नये.

कीर्तनकार किती विद्वान, त्याला जगातल्या किती भाषा येतात यापेक्षा भक्तिमार्ग वेगळा आहे हे खरे भक्तच जाणतात. याला रामदास स्वामींनी एक चपखल उपमा दिली आहे. ते म्हणतात 'चंदनाच्या झाडाला सर्पाने वेढावे किंवा पुरलेल्या द्रव्याच्या लाभाच्या आड भूत-पिशाच्च यावे तशा देवाच्या प्राप्तीच्या आड कधी कधी नाना कला येतात.

*सर्पी वेढले चंदनासी । निधाता आड विवसी*

*नाना कळा देवासी । आड तैस्या*

*येक मन गुंतले स्वरी । कोणे चिंतावा श्रीहरी.*

मानवाला एकच मन असते आणि तेच जर स्वरातच गुंफून पडले, तर श्रीहरिचे ध्यान कोणी करावे? म्हणून ईश्वराच्या ठिकाणी मन ठेवून हरिकथा करून या जगात धन्य व्हा.

तसेच हरिभक्ताच्या घरी कोणतेही हलके काम देखील मनापासून करतो आणि सर्व प्रकारे जाणीवपूर्वक त्यास साहाय्यभूत होतो आणि ज्याचा नामावर दृढ विश्वास असतो त्याला हरिदास असे म्हणतात. जो कोणी ईश्वराच्या ठिकाणी मन ठेवून हरिकथा करतो. तो या जगात धन्य जाणावा.

*मन ठेवून ईश्वर । जो कोणी हरिकथा करी*

*तोचि ये संसारी । धन्य जाणा ।*

## अंतरंग सजवा; शरीर नव्हे.

माणसाला शहाणपण शिकता येते. मूर्खपणाचा त्याग केला तर शहाणपण येईल. चातुर्याशिवाय श्रेष्ठपणा कधीही प्राप्त होत नाही. हे कळून सुद्धा आपले हित आपण का साधू नये? सन्मार्गाने जा म्हणजे जनात आणि सज्जनात मान्यता मिळेल. रामदास स्वामी हा विचार समजावून सांगताना हे अगदी सोप्या भाषेत पटवून देतात की,

*काळे माणूस गोरे होयेना । वनाळाच येत्न चालेना.*
*मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण*
*आंधळे डोळस होयेना । बधिर ते ऐकेना*
*पांगुळ पाये घेईना । हा सहजगुण*

आईबापापासून मिळालेले शरीराचे रूप आपल्याला पालटता येत नाही. पण अवगुण टाकून चांगले गुण अंगी आणता येतात म्हणून माणसाने सद्‌गुणी व्हावे. आपले मन चातुर्याने संपन्न करावे व जगात श्रेष्ठत्व मिळवावे. त्याखेरीज जीवन नासल्याप्रमाणे निष्प्रभ बनते.

*देहे नेटके श्रुंघारिले । परी चातुर्येविण नासले*

रामदास केवळ कवी कल्पना करणारे नाहीत. योग्य मार्गाने संपत्ती मिळवावी व तिचा उपभोग घ्यावा हे ते स्पष्ट करतात. त्यासाठी माणसाने आपले अंतरंग उत्तम गुणांनी युक्त करावे. नाना प्रकारचे ज्ञान प्राप्त करावे आणि संपत्ती मिळवून सावकाश तिचा उपभोग घ्यावा. आपण दुसऱ्याशी जसे वागतो तशीच प्रतिक्रिया तो आपल्याला परतफेड करतो. जर लोकांना त्रास दिला तर आपल्याला देखील खूप त्रास सहन करावा लागेल याची वर्तनात जाणीव ठेवावी.

ही शिकवण जणू येशू ख्रिस्ताने बायबलमध्ये Love thy neighbour as thyself अशा साधार्म्याची वाटते. जगाच्या पाठीवर ज्ञानी आध्यात्मिक लोकांची भाषा एकच असते.

रामदास स्वामी व्यवहारातील समाज रीत समजावतात की, आपण अहो असे सन्मानाने संबोधले तर का हो असे आपल्याला समोरचा बोलवतो आणि कोणाला आपण अरे म्हटले तर तोही तुम्हाला कारे असे प्रत्युत्तर देतो. अशी ही समाज रीत आहे हे कळत असून आपण अयोग्य वर्तन का बरे करावे? एखादा चातुर्याने अंतरंग समजतो आणि दुसरा कुणी उत्तम वस्त्रालंकाराने शरीरास शृंगारतो या दोघांत थोर कोणास म्हणावे? असा प्रश्न रामदास स्वामी उपस्थित करतात. त्याचे उत्तर देताना ते उपदेश करतात, दुसऱ्यास सुखी करावे त्यायोगे आपणही सुखी व्हावे.

*बहुतांचे मुखी उरावे । बहुतांचे अंतरी भरावे*
*उत्तम गुणी विवरावे । प्राणिमात्रासी*
*शाहाणे करावे जन । पतित करावे पावन*
*सृष्टिमध्ये भगवभ्दजन । वाढवावे ।*

म्हणून पुष्कळ लोकांच्या तोंडी आपले नाव असावे, पुष्कळ लोकांच्या अंत:करणात आपण प्रेमरूपाने भरून जावे आणि आपल्या उत्तम गुणानी अनेक लोकांना विवेकी बनवावे. त्याना पवित्र करावे नि जगात भगवंताची भक्ती वाढवावी.

## समाज मानसशास्त्र

अनेक व्यक्ती एकत्र आल्या की समाज बनतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती बदलली तर समाज आपोआप बदलतो. हा बदल अंतरंगातून हवा हे महत्त्वाचे सूत्र रामदास स्वामींनी जाणले होते. त्यामुळे समाजपरिवर्तनासाठी व्यक्तीला सुधारण्यावर त्यानी भर दिला आहे. जणू सामाजिक मानसशास्त्र त्यांनी जाणले होते. व्यक्तीचे अंतरंग सर्व मानवी संबंधाचे आणि मूल्यांच्या प्रचितीचे केंद्र आहे. असा त्यांचा ठाम विश्वास होता. रामदास स्वामींनी कोणत्याही व्यक्तीला समाजापासून वेगळे केले नाही. अनेक लोकांशी विविध तऱ्हेचे संबंध येतात ते

अत्यंत प्रेमाचे, आपुलकीचे आणि निःस्वार्थीपणाचे असावेत असा त्यांचा उपदेश आहे. अधिकाधिक लोकांनी प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधून सुखासमाधानाचे जीवन जगावे हे त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान म्हणावे लागेल.

नाना प्रकारचे वेष आहेत, नाना प्रकारचे आश्रम आहेत पण गृहस्थाश्रम या सर्वांचे मूळ आहे. देव, ऋषी, मुनि, योगी अनेक तापसी हे सारे गृहस्थाश्रमातच जन्मास येतात. नंतर ते आश्रम सोडून जातात व साधना, तपस्या करतात. पुढे अनुभूतीनंतर, समाजमान्यता, कीर्ती मिळाल्यावर ते गृहस्थी लोकांच्यात पुन्हा येतात आणि संचार करू लागतात.

*याकारणे गृहस्थाश्राम । सकळामध्ये उत्तमोत्तम ।*

*परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया*

आत्मदर्शन झालेल्या विवेक, वैराग्य संपन्न व्यक्तीच्या नुसत्या दर्शनानेही लोक समाधान पावतात.

रामदास स्वामींनी समाजाचे केलेले सूक्ष्म निरीक्षण काही वेळा आत्मपरीक्षण करायला लावते. स्वजातीची अवनती का झाली यावर त्यांनी केलेले विश्लेषणावर कोणी चर्चा केली नाही, या विचारांचा प्रसार हवा तसा झाला नाही. ते म्हणतात, 'हे लोक बुद्धिभ्रष्ट झाले आहेत. त्यांची बुद्धी असून नसल्यासारखी झाली आहे. त्यामुळे त्यांच्याठिकाणी शुद्ध आचार ही राहिलेला नाही. स्वतःचे श्रेष्ठत्व सोडून ते शिष्यांचेही शिष्य बनलेत. कित्येकजण दावलमलकाकडे जातात, कित्येक जण पिराला भजतात, तर कित्येकजण आपल्या इच्छेने तुर्क होतात. या काळातला आचार हा असा आहे. विचार कुठेच शिल्लक राहिलेला नाही. पुढे पुढे वर्णसंकट होणार आहे. हा आपला अध:पात होत आहे हे कळत नाही. त्यांच्या वृत्तीत बदल होत नाही त्याचा मूर्खपणाचा अभिमान नाहीसा होत नाही.

*त्याचि वृत्तिच वळेना ।*

*मिथ्था अभिमान गळेना । मूर्खपणाचा ।*

धड ना इहलोक धड ना परलोक, काहीच नाही अशी त्यांची स्थिती झाली आहे.

या परखड विश्लेषणात्मक सामाजिक विवेचनानंतर स्वामींना या परखडपणामुळे कोणाची मने दुखावली गेली तर नाहीत ना असे वाटू लागते नि

ते म्हणतात 'नशिबालाच दोष द्यावा हेच बरे. प्रसंगामुळे स्वाभाविकच बोलते गेले, तरी लोकांनी क्षमा करावी',

*प्रसंगे बोलिले स्वभावे । क्षमा केले पाहिजे ।*

## पुजारी वर्गाने कसे उन्नत व्हावे?

रामदास स्वामी एखाद्या वर्गाच्या अध:पतनाचे विश्लेषण करून नकारात्मक भूमिका घेत नाहीत तर त्याची उन्नती कशी होईल याचा समुपदेश एखाद्या समाज मानसशास्त्रज्ञाप्रमाणे करतात. ते अभ्यासून ते विचार आजही कसे उपयुक्त आहेत याची प्रचिती येते.

ते म्हणतात,

*'आला तो होऊन गेला । आता तरी ब्राह्मणी आपणासी । शहाणे करावे ।'*

वाईट अवस्था आली तो प्रसंग आला तो येऊन गेला. झाले गेले होऊन गेले म्हणून समजून ब्राह्मणानी आता तरी स्वत:ला शहाणे करावे. त्यांनी देवाची पूजा निर्मल हाताने करावी. त्यायोगे त्याचे भाग्य उजळते. मूर्ख, गैरशिस्त, अभक्त असा उपासक दारिद्र्य भोगतो. प्रथम देवाला ओळखावे मग अनन्यभावे त्याला भजावे. त्या सर्वोत्तमाचे अखंड ध्यान धरावे. जगताचा जो अंतर्यामी तोच सर्व प्राणिमात्रात आहे म्हणून सर्वांची अंत:करणे राजी राखावीत. तोच परस्परांचा दाता, भोक्ता इत्यादी सर्व काही आहे. तोच प्राणिमात्रांच्यात आहे. हे नीट जाणून घ्यावे. सर्व प्राणिमात्रास प्रयत्न राखावे. दुर्जनाच्या वागण्याने राग येणे साहजिक आहे पण त्याच्याशी भांडण करू नये. प्रसंगी सोडून द्यावे आणि विवेकाने वागून सर्वलोकात सज्जनपणा दाखवावा. विवेकाची शक्ती ही अंतरात्म्याची देणगी आहे. जागृती, स्वप्न याचे व्यवहार त्याच्यामुळेच होतात. हे सारे विवेचन नीट कळले म्हणजे सहजच देवाचे स्मरण होते आणि अखंड ध्यानाचे हेच लक्षण आहे.

अनेक जणाना प्रश्न पडतो की ध्यान कसे करायचे. रामदास स्वामींनी फार सोप्या भाषेत सांगितले आहे की, सहज देवाचे स्मरण करताना ध्यानात नाना व्यक्ती येतात. लोक मनाला कासावीस करून उगीचच कष्टी होतात. मूर्तीचे ध्यान मोठ्या कष्टाने करावे तर भलतेच डोळ्यापुढे येते. जे भासू नये असे वाटते तेच समोर येते.

*देह देऊळ आत्मा देव । कोठे धरू पाहातां भाव ।*

*देव ओळखोन जीव । तेथेचि लावावा.*

ध्यानाचे तीन प्रकार रामदास स्वामी वर्णितात.

**१) अंतर्निष्ठ ध्यान २) दंडक ध्यान ३) अनुमान ध्यान**

देव कोठे आहे हे ओळखून केलेले ध्यान अंतर्निष्ठ ध्यान, अंतर्निष्ठ ध्यान रूढ पद्धतीने केलेले ध्यान म्हणजे दंडक ध्यान आणि अनुमानावर आधारलेले ध्यान म्हणजे अनुमान ध्यान. अनुमान ध्यान हा शुद्ध वेडेपणा समजा असे ते सांगतात. ध्यान धरणारा आणि जे ध्यानात आठवते तो कोण? या दोहोत एकात्मभाव असला पाहिजे. मग अंतर्निष्ठ ध्यान लाभते.

रूढ पद्धतीनुसार ध्यानाचे लक्षण मनात ठेवून बसतात ते दंडक ध्यान हेच अवलक्षण आहे. प्रमाण काय, अप्रमाण काय हे अध्यात्माचा बाजार मांडणारे लोक जाणत नाहीत. असे लोक बाजारी असतात. खऱ्या ध्यानात प्रत्यक्ष कष्ट करावे लागत नाहीत. दोऱ्यात फुले गुंफावी लागत नाहीत. तरी कल्पनेतील माळ आखूड करतात अशा मूर्खाशी वादविवाद करू नये, तो टाळावा.

अनुभवाशिवाय अभिमान करणे म्हणजे रोगी झाकून त्याला मारण्यासारखे आहे. सर्वच अनुमान असेल तेथे ज्ञान कसे येणार? सर्व अभिमान सोडून द्यावा. अनुभवाने विवेक प्रतिपादावा. मायेच्या पूर्वपक्षाचे विवेकाच्या बळाने खंडन करावे आणि परमात्मा प्राप्ती करून घ्यावी.

## शाश्वत

परब्रह्माला चर्मचक्षूने पाहू गेले तर ते दिसू शकत नाही. पण वास्तविक परब्रह्म सर्व दृश्य जगताच्या अंतर्बाह्य ओतप्रोत भरलेले आहे. त्याला अंतच नाही. त्या अनंताची बरोबरी कोण करू शकणार? जे चंचल असते ते कधी स्थिर राहू शकत नाही. जे निश्चल असते ते कधीही चळत नाही. गगनात आभाळ म्हणजे ढग येतात आणि जातात पण गगन चळत नाही. ते निश्चल जसेच्या तसे असते. जे विकार पावते, वाढते आणि मोडते ते शाश्वत कसे असू शकेल? कल्पांत होतो तेव्हा सर्व पंचभौतिक सृष्टी नाश पावते. ज्यांच्या अंत:करणात मायेमुळे भ्रम उत्पन्न झालेला असतो अशा संभ्रमित लोकांना या अफाट चक्राचा उलगडा होणे कठीण.

त्यांना व्यवहारही कळत नाही. अंतर्यामीच असलेल्या देवाचाही शोध लागत नाही. वैद्याच्या औषधाचा गुणही येत नाही आणि त्याची भीडही  मोडता येत नाही. अशी जेव्हा स्थिती होते तेव्हा रोगी आता जगणार नाही असे जाणावे. माया अलीकडे आणि परब्रह्म मायेच्या पलीकडे असते. जे खोटे आहे, त्या सर्वांचा त्याग करावा आणि अनुभवाने खरे ओळखावे. मायेचा त्याग करून शाश्वत जाणून घ्यावे.

पण उपासकांना प्रश्न पडतो की ही माया ओळखावी कशी? तिची लक्षणे कोणती ?

## मायेची लक्षणे

रामदास स्वामींनी मायेचे वर्णन केले आहे. त्यामुळे मायेचा त्याग करणे सोपे जाते. ते म्हणतात 'जे जग दिसते तसे ते नसते. तो मनाचा भास असतो. मन अज्ञानमय असल्याने सद्वस्तू जशी आहे तशी ती अनुभवता येत नाही. असते एक आणि दिसते भलतेच याचे नाव माया. इंद्रियगोचर जग आपण अनुभवतो पण परब्रह्म इंद्रियांच्या अनुभवाच्या पलीकडे असते.'

मायेची लक्षणे कशी असतात हे समजावताना रामदास स्वामी आळशी, करंट्या माणसाने अंथरुणात आळसाने पडून राहावे व मनोराज्य करीत रहावे. तशीच माया जाणावी किंवा स्वप्नात द्रव्य आणि स्त्री यांचे कितीही वैभव आणि हातभाव नाना विलास पाहावेत. स्वप्नात ते खरेही वाटतात पण वास्तविक ते मिथ्या असतात. तशीच माया जाणावी.

दसऱ्याच्या सणाला लोक सोने लुटतात. लोक जगरहाटीप्रमाणे त्याला सोने म्हणतात पण ती असतात आपट्याची पाने. माया अशीच असते. एखादी विधवा असते आणि तिचे नाव जन्मसावित्री असते किंवा आडनाव कुबेर आणि तो दारोदार भीक मागत हिंडतो. ते मायेचे लक्षण होय. बेताचे पाणी असते पण तिचे नाव अमृताची नदी अशी ही माया असते. बाईचे नाव सरस्वती पण विद्याभ्यास करीत नाही नुसत्या गोवऱ्या थापते तशी ही माया. एखाद्या कुरूप स्त्रीला सुंदर म्हणून तिचे लाड करावे. तशी ही माया. फुटक्या डोळ्याच्या माणसाला डोळस किंवा सुंदर डोळ्याचा म्हणावे तशी माया असते. सावली आणि आधार एकत्र मिसळले तर काय होते याचा विचार करावा. ते दोन्हीही प्रकाशहीन

असतात. त्यात प्रत्यक्ष वस्तू दिसत नाही. त्यावरून वस्तूची कल्पना केली तर ती भासमात्रच असते तिला माया म्हणतात. अज्ञानी अहंकाराला ज्ञानमय ब्रह्माचे खरे स्वरूप कळणार नाही. कळले असे वाटणे हा भ्रम, माया असते. भोवळ आलेला माणसाला पृथ्वी फिरल्यासारखी वाटते, कावीळ झालेल्याला ती पिवळी दिसते. मूळ पदार्थ वेगळा वाटणे ही माया. विश्व खरे ब्रह्मस्वरूपच आहे.

## कर्मानुसार श्रेष्ठ वा कनिष्ठता

माणसाने विवेकाने आपले मन दुसऱ्याच्या मनाशी मिळवून घ्यावे. ढिलेपणामुळे उगीच मनात नाना कल्पनांना वाव मिळतो. हे कसे शक्य आहे? तर त्यासाठी माणसाने जिवाला जीव द्यावा. आत्मात आत्मा मिसळावा म्हणजे आपले एकरूपत्व जापून सर्वांशी आत्मीयतेने वागावे. राहून राहून दुसऱ्याच्या अंत:करणात काय चालले आहे याचा शोध घ्यावा. हा राजमार्ग आहे. तो सोडून कोणी सामान्य जनतेला आपलेसे करून घेण्यासाठी वशीकरणासारखे तांत्रिक प्रयोग करतात आणि अखेर फसतात.

समर्थांनी साधा सरळ उपाय सांगितला, तुम्ही व्यवहारी बना, अनेक लौकिक विषयांचे ज्ञान ठेवावे, निःस्पृहता असावी. ओळखीने ओळख करून घ्यावी. लोकांना बुद्धीने विचार करायला शिकवावे. त्यांचे प्रेम तोडू नये. त्यांच्या मनाचे समाधान करावे. एकाच ठिकाणी फार काळ राहिल्याने व्याप सांभाळता येत नाही म्हणून एक ठिकाणी सारखे न राहता प्रत्येकाला सावधपणे भेटत जावे, भेटून माणसांचे मन राखावे. आपल्या अंगी उत्तम गुण असावे कारण ते पाहून माणसाला समाधान वाटते.

*जातीमुळे माणूस श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरतो हे समर्थांना मान्य नाही. ते म्हणतात*

*श्रेष्ठ कार्ये करी श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ कर्मानुसार प्राणी नष्ट अथवा भले ।।११।।* *दशक १५ समास ९*

जो श्रेष्ठ कार्य करतो, तोच श्रेष्ठ होय. कनिष्ठ असतो तो सामान्य कार्य करतो आपापल्या कर्मानुसार माणूस श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरतो.

हे महत्त्वाचे सूत्र स्पष्ट करताना ते सांगतात. राजे लोक राजमार्गाने जातात. चोर असतात ते चोरवाटेने जातात. वेडे लोक असतात ते थोडासा स्वार्थ

साधण्यासाठी मूर्खपणाने वागतात. आपापल्या अभिमानामुळे लोक काल्पनिक जगात वावरतात. पण विवेकाने हे सर्व नीट जाणून सत्याचा सर्वस्वी त्याग करायचा ही तर चक्क मूर्खपणाची लक्षणे आहेत. उत्तम आचार-विचाराशिवाय जे जे काही करावे तो उगीच शीण होय. म्हणून चतुर आणि विद्वान माणसांचाच शोध घ्यावा. निःस्पृह असून ज्याच्याठिकाणी नित्य नूतन स्वानुभवपूर्व ब्रह्मज्ञान प्रगट दिसते असते असा जाणता, सज्जन या जगात दुर्लभ आहे.

जितके लोक तितक्या प्रकृती, भिन्न-भिन्न स्वभाव, सुरुवातीपासून शेवटापर्यंत एकसारखा दुसरा आढळत नाही. त्यात काही नियम नसल्याने किती भिन्नता आढळते, ते कसे सांगावे. कोणी धर्मांतर केले. कोण राजकारणात अडकले, कोण युद्धप्रसंगात गुंतले, कोणी व्यापार प्रचंड वाढवला. शिवाय नास्तिकवादी दर्शनांची चर्चा करीत बसले त्यामुळे मतमतांतरे वाढली. गोंधळाची स्थिती निर्माण झाली. ज्ञान दुर्लभ झाले. पुण्यवानालाच ज्ञानाचा अलभ्य लाभ होतो.

जे हुशार असतात ते आपला एक क्षणही फुकट जाऊ देत नाही. परिस्थिती चांगली नसली तरी चतुर, ज्ञानी पुरुष तिचा भेद करतो व व मार्ग काढतो. तो ज्ञान सांगतो, लोकांना जागे करतो, लोकांचे अंत:करण तो ओळखतो. त्यामुळे त्याचे निरूपण ऐकल्यानंतर लोकांना गोडी वाटू लागते. अर्थहीन परंपरा सोडतो. जे बोलतो ते स्वानुभवावर आधारित असतो. स्वत: दूर राहून, अलिप्त राहून समूहाने समूह निर्माण होतात. त्यातून तो मोठी संघटना तयार करतो. लोकसंग्रहाच्या अनेक युक्त्या त्याच्याजवळ असतात. त्यामुळे तो दूरवर परमार्थबुद्धी पसरवतो. अनेक लोक शहाणे होतात. त्याच्या ज्ञानाचा प्रत्यय अनेकांना अनेक ठिकाणी येतो. समर्थ म्हणतात की अशा तऱ्हेने कीर्ती संपादून जाण्यातच संसारात येण्याचे सार्थक आहे.

*ऐसी कीर्ति करून जावे । तरीच संसाराचे यावे ।।*

*दास म्हणे हे स्वभावें । संकेते बोलिले ।।*

## साक्षी अंतराला

या दिसणाऱ्या सृष्टीचा पसारा पंचमहाभूतापासून झालेला आहे. त्यात जो साक्षित्वाचा, जाणिवेचा दोरा ओवलेला आहे तो म्हणजे अंतरात्मा. हाही

तत्त्वरूपच आहे. पंचमहाभौतिक म्हणजे दोन्ही बाजूला उभे असणारे सैन्य मानले तर मधोमध सिंहासनावर बसलेला साक्षी म्हणजेच अंतरात्मा हा राजासारखा श्रेष्ठ होय. राजा आणि प्रजा सर्वच पांचभौतिक आहेत. राजाच्या सत्तेने सर्व कारभार चालतो. विवेकाने जे व्यापक झाले त्यांना अवतारी म्हणतात. ज्याच्या ठायी अंतरात्मा प्रकाशित होतो, जागृत होतो त्या माणसाला आपोआपच मोठेपण प्राप्त होते. म्हणून प्रत्येकाने विवेकाने शहाणपण शिकून घ्यावे. एकंदरीत जन्माचे सार्थक करून घ्यावे. आपणास कळत नसेल तर ग्रंथांचा अभ्यास करावा. 'ग्रंथ माझा गुरू' असे समजून जाणून घ्यावे.

विवेकाने येणारे शहाणपण माणसाच्या जन्माचे सार्थक करते. याच्या उलट शहाणपण नसणारा माणूस दुर्दैवी तर असतोच पण बायकापोरे सुद्धा त्याची अवहेलना करतात. अशा माणसाची जनमानसात काही किंमत उरत नाही. त्याचा जन्म फुकट गेला. त्याला आपणहून हीन दशा प्राप्त होते.

*आपलें हित न करी लोकिकी । तो जाणावा आत्मघातकी ।*

*या मूर्खाएवढा पातकी । आणिक नाही ।।*

साधकाने कसे वागावे हे रामदास स्वामींनी सहजतेने शिकवले. पण ते स्वीकाराच असा त्यांचा आग्रह नाही. मनाला पटले तर आनंदाने स्वीकारा जर नाही पटले, आवडले तर सोडून द्या.'' अशा रीतीने आनंदमय संवाद गुरु शिष्यात होतो.

जगात इतके असंख्य पदार्थ आहेत की, त्यांचा विस्तार किती म्हणून वर्णन करावा. पण सर्वांना शेवटी पृथ्वीशिवाय पर्याय नाही; थारा नाही. ज्याचा ज्याचा उत्पत्ती, स्थिती व संहार होतो ते सर्व शेवटी पृथ्वीतच मिसळून जाते मग तो मानव, पशू, पक्षी, नाना धातू सारे काही माती बनते. जे जे तत्त्व जेथे निर्माण होते ते ते तेथेच लय पावते. याप्रमाणे पंचमहाभूते नाश पावतात. त्या परब्रह्माचे ज्ञान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जन्ममरण चुकत नाही. जगात सत्य ते मिथ्या पण या दोन्ही पक्षाहून जे अलिप्त ते परब्रह्म. सर्वत्र ओतप्रोत भरलेले आहे ते शाश्वत तत्त्व.

## पुरुष आणि प्रकृतीचा खेळ

समर्थ रामदासांनी गीता, उपनिषद, ब्रह्मसूत्र यांच्यावर संमिश्र भाष्य केले आहे. भारतीय संस्कृतीमधील सांख्यवाद हाही महत्त्वाचा विचार आहे.

दासबोधाच्या शेवटच्या चौथ्या भागात प्रकृती आणि पुरुष याविषयी भाष्य आढळते. ते म्हणतात, पुरुष आणि प्रकृती या दोहोंच्या प्रेरणेने सत्त्व, रज, तम हे त्रिगुण-त्रिदेव गुणातीत अशा परब्रह्मात वागत असतात. ज्याप्रमाणे मांजर आणि सर्प एकमेकांवर टपून बसतात त्याप्रमाणे ही सूक्ष्म चंचल प्रकृती भौतिक आणि अदिभौतिकाच्या मध्ये खेळत असते.

प्रकृती आणि पुरुष ही दोन्ही नावे वस्तुतः एका मायेचीच आहेत. वरकरणी ही दोन वाटतात पण विवेकाने याचा अनुभव घेतला की, दोन्ही एकाचीच नावे आहेत हे कळते. नावाप्रमाणे येथे कोणी पुरुष वा स्त्री नाही. लोकांनी तत्त्वांच्या ठिकाणी अशी कल्पना केलेली आहे. सारासार विवेकाने याचा शोध घेतला की कळून चुकते की खरे तर येथे काहीच नाही.

पुरुष-प्रकृतीचा विलास हा सहजासहजी समजत नाही. त्यांचे विवेचन आपापल्या कल्पनेप्रमाणे शास्त्रकारांनी केलेले आहे. जो ज्ञानी असतो, त्यालाच सर्व काही नीट समजते. जे अंतर्निष्ठ असतात ते फार उच्च कोटीचे जाणावेत. जे बहिर्मुख असतात त्यांची संगती खोटी म्हणजे वाईट असते. पण मूर्खाला या गोष्टी कळत नाहीत. शहाणे लोक असतात तेच सर्व जाणतात. म्हणून अलक्ष्य अशा परब्रह्माकडे लक्ष लावावे. त्याचे अनुसंधान ठेवावे.

समर्थ या किचकट प्रक्रियेला सोपे करतात म्हणतात. 'गुरुशिष्यांचा ऐक्यभाव झाला, मनास मन मिळाले की, त्या निरंजन परमात्म्यास पाहता येते आणि मायेचा - मीपणाचा सर्व उपद्व्याप ओलांडून पलीकडे जाता येते.

एकदा का या निरंजन परमात्म्याचा अनुभव आला की तो सदैव अगदी जवळच आहे असे दिसते म्हणजे जेथे पाहावे तेथे सर्वत्र तोच दिसतो. जेथे सारासार विचार नसतो तेथे सर्व अंधःकारच असतो. अज्ञानी माणूस सत्य असे सार सोडून खोटे असार ग्रहण करतो. एखाद्या अज्ञानी लहान मुलासारखे त्याचे हे वागणे असते.

*कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकांड वेद हे प्रमाण ।*

*ज्ञानाचे होते विज्ञान । परब्रह्मी ।।*

## ऐकावे जनाचे करावे मनाचे

काजळ किंवा पिवळ्या हिरड्यापासून बनवलेली शाई तसे पाहिले तर अगदी क्षुल्लक वस्तू आहे. पण तिच्यामुळेच सर्वत्र सर्व प्रकारचे ज्ञान साठविले जाते. अधम गुण आणि उत्तम गुण दोन्ही तिच्यातच सामावलेले असतात. महीसूत म्हणजे बोरू पुढे सरसावतो. नंतर त्याला तासून छेद दिला जातो. त्याप्रमाणे शाई आणि बोरू या दोघांच्या संयोगाने सर्व लिखाण, सर्व कार्यभाग चालतो. श्वेत कागद आणि अश्वेत बोरू यांची गाठ पडली आणि त्यात कृष्णशाई मिश्रित झाली. त्यामुळेच इहलोकात सार्थकता प्राप्त होते. आणि परब्रह्माचा साक्षात्कारही होऊ शकतो.

अनेकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवल्याने माणूस संशयात बुडून जातो आणि मुख्य जे अनुभवाचे निश्चयात्मक ज्ञान त्यास मुकतो. अनेक लोक अनेक गोष्टी सांगतात त्या सर्व ऐकून घ्याव्यात पण आपणाला ज्याचा साक्षात अनुभव येईल त्यावरूनच अंतःर्यामी खऱ्याखोट्याची निवड करावी.

*उद्दंडाचे उद्दंड ऐकावे । परी ते प्रत्यये पाहावे ।*

*खरेखोटे निवडावे । अंतःर्यामी ।।*

कुणाचे मत खोडून काढू नये, पण आपण मनाशी विचार करून उपाय आणि अपाय समजून घ्यावे आणि स्वतः प्रत्यय घ्यावा. उगीच वादंग वाढवणे हा मूर्खपणा होय. एकदा कलह उत्पन्न झाला की, तेथे चातुर्याला वावच उरत नाही.

पुष्कळांच्या ठिकाणी काही ना काही घेण्यासारखा गुण आढळतो. विचारी लोकांशी मैत्री होते.

ज्याला जे पाहिजे असेल ते त्याप्रमाणे त्याला द्यावे म्हणजे सर्व लोकांची मान्यता मिळून माणूस श्रेष्ठ होता. जो या जगात सर्वमान्य होतो त्यास सामान्य समजू नये. त्या पुरुषाशी कित्येक लोक एकनिष्ठ होतात. ही सारी चातुर्याची लक्षणे होत. त्याप्रमाणे जो वागतो तो लोकांची मने जिंकतो त्याला मग तो कुठेही गेला तरी काहीही उणे पडत नाही.

## पिंडोत्पत्ती

भागवत ग्रंथामध्ये आणि ग्रीक ग्रंथामध्ये जलतत्त्वामुळे निर्मिती होते असा विचार मांडला आहे. थेल्स हा ग्रीक तत्त्वज्ञ जगातील अंतिम सत्ता म्हणजे जल-

पाणी मानीत असे – ख्रिस्तपूर्व सातव्या शतकात तो जन्मला होता. भागवतात तर उद्‌बीज, अंडज असा उत्क्रांतीतील जन्माचे विवेचन डार्विनच्या संशोधनापूर्वी आढळते. रामदास स्वामींनी दासबोधाच्या दशक १५ मध्ये पिंडोत्पत्तीचे विवेचन करताना भागवत ग्रंथाचा आधार घेतलेला दिसतो. ते म्हणतात, 'सर्व प्राण्यांचे शरीराचे मूळ शोधले की ते उदकरूप आहे हे कळून येते. शरत्‌काली घामरूपाने जसे सर्वांगातून पाणी झिरपते, त्याप्रमाणे सर्वांगाचे सारभूत असे पुरुषवीर्य आणि स्त्री रेत ही रक्तात एकत्र मिसळतात. अन्नरस, देहरस, रक्त आणि रेत यांची मूस तयार होते आणि त्यातून पिंडोत्पत्ती होते. शरीर सावकाश वाढू लागते. ते वाढता वाढता कोमलपणा जाऊन कठिणपणा येतो आणि त्यानंतर उदकामुळेच नाना अवयवांचा विस्तार होतो. संपूर्ण वाढ झाली की ते बाहेर पडते, भूमीवर पडले की रडू लागते. सर्व प्राण्यांच्याबाबत सर्व असेच घडते. कुडी म्हणजे शरीर वाढू लागते. फळामध्ये बीजे असतात ती उदकामुळेच अंकुरतात. उदक मिळाले नाही तर नष्ट होतात. वनस्पती, फुले, फळे यांची उत्क्रांती समर्थांनी वर्णन केली आहे.

पंचमहाभूतापेक्षा (आप, तेज, वायू, आकाश, पृथ्वी) अंतरात्मा वडील आहे, श्रेष्ठ आहे. आपला व्यासंग, व्यवसाय करावा पण ध्यानाभ्यासात कधी खंड पडू देऊ नये. अंतरात्मा जेथे जागा होतो तो पुरुष भाग्यवान ठरतो. नारायण ध्यानीमनी अखंड आठवावा. उपासना म्हणजे काय याचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा विश्वरूप अंतरात्म्याची सेवा असेच समजते. त्या आत्मारामाला जाणा म्हणजे निरंजनाच्याही पलीकडे तुम्ही जाऊन पोहोचाल.

***नाना शास्त्रे नाना मते । देवाचे बोलिला समस्ते ।***
***नेमकांनेमक वेस्तावेस्ते । कर्मानुसार ।।***

नाना शास्त्रे, मते, त्या देवानेच निर्माण केली हे खरे, पण त्यातून योग्य तेच घ्यावे. आपापल्या योग्यतेनुसार चालावे म्हणजे बरे, महावाक्याचा लक्ष्यार्थ अनुभवा.

***नाना वर्ण नाना रंग । नाना जीवनाचे तरंग ।***
***येक सुरंग येक विरंग । किती म्हणोन सांगावे ।।***

जीवनाचे नाना प्रकारचे तरंग म्हणजे जीवनपद्धती असतात त्यामध्ये नाना वर्ण, नाना रंग असतात. काहींचे रंग सुंदर असतात. तर काहींचे रंग चांगले नसतात. किती म्हणौन सांगावे.

ईश्वराने शरीरेही विविध प्रकारची बनवली आहेत. काहींची शरीरे कोमल आहेत तर काहींची कठिण. कुणाचे सोन्यासारखे चकचकीत तर कोणाचे गोरे, कोणाचे सावळे तर कोणाचे काळे. विविध प्राण्यांच्या आहारातही नाना भेद आहेत. वाचेमध्ये आणि गुणामध्येही भरपूर भेद आहेत. पण समर्थ रामदास म्हणतात त्या सर्वांच्या अंतरात अंतरात्मा सर्वत्र एकच असतो.

एक प्राणी तारणारा तर दुसरा मारणारा असतो. या सृष्टीत अनेक अमोलिक चमत्कार पाहायला मिळतात. जेथे जल तेथे जीव. समुद्रातले जलचर प्राणी हा एक अभ्यासाचाच विषय बनतो. काही प्राणी अंतरिक्षात असतात. आकाशात संचार करणारे पक्षी, पृथ्वीवरील प्राणी आणि समुद्रातील जलचर प्राणी हे पाहिले तर परमेश्वराची निर्मिती समजणे मानवी बुद्धीला अशक्य आणि अतर्क्य आहे.

याशिवाय अंतःर्जगतातील जीवांचा शोध हा वेगळाच विषय. ही विश्वरचना पाहिली तर एखाद्याला थोडे फार कळेल, पोटापुरती विद्या तो शिकला तरी त्याला आपणाला सारे कळले, आपण ज्ञानी झालो असा गर्व होतो आणि असा गर्व अनाठायी असतो नि मग असा माणूस वाया जातो.

समर्थ विचारतात, ‘माणसाला आपल्या देहात काय काय आहे हे नीट कळते का हो ? जर कळत नसेल तर मग सर्व सृष्टीतील जीवांचे ज्ञान कसे असणार ? पण अज्ञानी लोक अल्प ज्ञानाने उतावळे होतात.

खरोखरीच परमेश्वराची करणी अद्भुत, धन्य, अलौकिकच अशी आहे. कितीही कल्पना केली तरी अंतःकरणात तिचे ज्ञान होऊ शकत नाही. पण अहंतारूपी पापीण माणसाला उगीच गुंतवून ठेवते. देवाची करणी आहे तिचे अहंता सोडून विवरण केले पाहिजे. मनुष्याचे आयुष्य इतके थोडे अल्प आहे की विवरण करण्यास ते पुरणार नाही. देह आणि संपत्ती फक्त काही दिवसापुरतीच असते. अहंतेचे बंड मोडून काढावे आणि विवेकाने देवाचा शोध घ्यावा हेच उत्तमोत्तम होय.

## अद्वैतानुभूती

जगरचनेचे विवरण करता करता शेवटी निवृत्तीपदाची प्राप्ती होते. निश्चळ परब्रह्माशी अखंड भेट होते नि मग परत ताटातूट होत नाही. अशा प्रकारे आत्म

साक्षात्कार झाला की द्वैत राहतच नाही, ज्ञानाचे विज्ञान होते, मनाचे उन्मन होते आणि सारासार विवेकाने तत्त्वांचे निरसन होऊन जीव परब्रह्माशी अनन्य म्हणजे एकरूप होतो. ही अद्वैतानुभूतीच होय.

ज्याच्या मनात ब्रह्म ठसले त्याच्या बाबतीत पूर्वपक्ष म्हणजे माया उडूनच जाते आणि अंतरात्मा जो हेतूरूप असतो तोही मावळतो.

*शाश्वतास शोधीत गेला । तेणे ज्ञानी साच जाला ।*

*विकार सांडून मिळाला । निर्विकारी ॥*

शाश्वताचा शोध घेता घेता शोध घेणाराच ज्ञानी सत्यस्वरूप होतो. विकारांचा त्याग होऊन तो निर्विकारी ऐक्य पावतो. अशा ज्ञानी माणसात वासनांचे बीज शिल्लक राहते का? असा प्रश्न पडतो, त्याला समर्थांनी एक सुंदर उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे अग्नीने बीज भाजले की त्याला परत अंकुर फुटू शकत नाही. त्याप्रमाणे ज्ञानी माणसाच्या मनात परत वासना निर्माण होत नाही. आणि शुद्ध झालेल्या जिवाला पुन:पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात येण्याची गरज उरत नाही. विवेक जागृत झाला की त्यामुळेच आत्मस्वरूपी बुद्धी स्थिर बनते. जणू परब्रह्माशी मिसळून जाते, त्याचा परिणाम म्हणजे ज्ञानी माणसाचे भयच नाहीसे होते. तो खऱ्या अर्थाने अद्वैतानुभूती घेतलेला निर्भय महात्मा बनतो.

समर्थ अशा अद्वैतानुभूतीचे सारे श्रेय श्रीराम उपासनेला देतात. अंतरी विवेक बाळगावा. यशापयश गृहीत धरावे. आपली जीवनातली भूमिका चळूं देऊ नये. सर्व काही सदसद्विवेक बुद्धीने करावे. दासबोधाच्या शेवटच्या चार दशकात स्वामींनी शतकोटी संख्यायुक्त रामायणाच्या रचनेचे शिल्पकार पुण्यश्लोक वाल्मि की ऋषींचे स्मरण आणि स्तुती केली आहे. तुमचा, भूतकाळ सांगणारे अनेक भेटतील पण भविष्यात घडणाऱ्या गोष्टी आणि त्या पुढे खऱ्या ठरतात असे एखादे वचन अनुभवास आले तरी तो मोठा चमत्कार वाटतो. ज्यावेळी प्रभू राम चंद्रांच्या जन्मही झालेला नव्हता आणि कोणत्याही शास्त्रात तसा उल्लेख नसताना रामायणाचा अफाट विस्तार मांडण्याचा वाग्विलास मानवजातीला थक्क करणारा आहे. वाल्मिकी ऋषींचे हे कवित्व मानवी बुद्धीच्या आकलनाच्या पलीकडचे आहे असे समर्थांना वाटते. रामायण हे महाकाव्य रचणारा वाल्मिकीसारखा कविश्वर या भूतलावर झालाच नाही.

वाल्मिकी काही ब्राह्मण कुळात जन्मले नाहीत. ते कोळी समाजात जन्मले. त्यांना वाल्या कोळी म्हणत पण त्यांच्या तपोबलाने ते ऋषींपदाला पोहोचले. गुणामुळे, कर्मामुळे ते श्रेष्ठत्व पावले. त्यांच्या तपोबलाने शुष्क काष्ठालाही अंकुर फुटले. केवळ जन्माने नव्हे तर गुण-कर्माने श्रेष्ठत्व लाभते. इतके की सगळे देव, विद्वान आणि ऋषिमुनीही त्यांच्यापुढे नतमस्तक झाले.

समर्थ वाल्मिकींचे गुणवर्णन करताना म्हणतात,

*जो तापससांमाजी श्रेष्ठ । जो कवेश्वरामधे वरिष्ठ ।*

*जो निष्ठावंतांचे मंडण । रघुनाथभक्तांचे भूषण ।*

*ज्याची धारणा असाधारण । साधका सदृढ करी.*

*धन्य वाल्मिकी ऋषेश्वर । समर्थाचा कवेश्वर ।*

*तयासी माझा नमस्कार । साष्टांग भावे ।।*

यापुढे समर्थ सूर्यस्तुती करतात. रघुनाथाचा वंश हा सूर्यवंश. रघुनाथाचा तो पूर्वजच. सूर्यास नमस्कार केल्याने सर्व दोषांचा परिहार होतो आणि सूर्यदर्शन घेतल्याने निरंतर स्फूर्ती वाढते. समर्थ रामदासांनी सूर्योपसाना केली. गायत्री मंत्र हा या भौतिक सूर्याला नव्हे तर पृथ्वी, त्यावरील भूव: लोक आणि स्वर्ग लोक या तिन्ही जगांचा स्वामी आहे. म्हणून समर्थांनी गायत्री पुरश्चरण केले. यापुढे ते पृथ्वी, आप, अग्नी, वायुदेव, पाणी या पंचमहाभूतांची व्याप्ती मानवी जीवन, जीवसृष्टी व पृथ्वी यांच्या संदर्भात वर्णन करतात. त्यांची महती सांगतात. पंचमहाभूतांच्या चलन वलनामुळे सजीवाला चैतन्य प्राप्त होते. असे समर्थ पटवून देतात.

यानंतर आत्मारामाला वंदन करता करता रामनामाचे महत्त्व विषद करतात.

*सकळ जनामधे नाम । रामनाम उत्तमोत्तम ।*

*श्रम जाऊन विश्राम । चंद्रमौळी पावला ।।*

सर्व नामात रामनाम हे उत्तम आहे. त्याच्या प्रभावाने खुद्द चंद्रमौळी शंकराचा शीण नाहीसा होऊन त्याला विश्राम प्राप्त झाला. म्हणून समर्थ सांगतात-

*भजन साधन अभ्यास । येणे पाविजे परलोकास ।*

*दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ।।*

भजन, साधन आणि अभ्यास या तीनही गोष्टींमुळे परमार्थ साधला जातो. रामदास म्हणतात की यावर माणसाने श्रद्धा ठेवावी.

## अजपानिरूपण

नामस्मरणाचा महिमा ऐकून चालत नाही. तो आचरणात आणावा लागतो. नामस्मरणाला श्वास, उच्छ्‌श्वासाची योग्य ती जोड दिली की, त्यालाच अजपा म्हणतात. दिवसरात्र मिळून माणसाचे एकवीस हजार सहाशे श्वास, उच्छ्‌श्वास होतात. स्वराचे तीन प्रकार आहेत. टाळूत जाणवणारा उच्च स्वर, मंद्र किंवा मध्य स्वर हृदयात जाणवणारा आणि घोर म्हणजे खालचा स्वर म्हणजे नाभीजवळ जाणवणारा. पण अजपाचा विचार हा घोराहूनही सूक्ष्म आहे. परा वाचेपासून वर म्हणजे नाभीपासून वर आणि पश्यंतीच्या खाली म्हणजे हृदयाच्या खाली स्वरांचे जन्मस्थान आहे. तेथून स्वरांची अजपाजपाची सुरुवात होते.

एकांतात अगदी शांत बसा. हे सारे नीट समजून घेऊन प्राणवायू अखंड घ्यावा आणि सोडावा. एकांती मौन धरून, सावधपणे श्वासोच्छवास होत असता लक्षपूर्वक पाहावे. म्हणजे सोहं सोहं असा शब्द होत असल्याचा भास होईल. उच्चाराशिवाय जे शब्द त्यांना सहजशब्द म्हणतात. ते अनुभवाला येतात परंतु नाद, आवाज काहीच अनुभवाला येत नाहीत. तो नाद म्हणजे सोहं हा शब्द आणि त्याचा लक्ष्यार्थ याचाही लय होऊन जो बसतो तो साधक खरा मौनी आहे असे म्हणावे – हे साध्य व्हावे म्हणून लोक योगाच्या अनेक प्रक्रिया करीत असतात.

एकांतात मौन धरून बसल्यावर जो सहज शब्द ऐकू आला तो अंतर्यामी सोहं असाच भासतो. श्वास घेताना सो आणि सोडताना हं असा अखंड सोऽहं सोऽहं शब्द ऐकू येतो. याचा विचार करू लागलो की त्यात सखोल अर्थ भरलेला आहे हे समजते.

देहधारक म्हणून जितके प्राणी स्वेदज, उभ्दिजादिक आहेत ते सारे श्वासोच्छवास करूनच जगतात. त्याखेरीज ते जगूच शकत नाहीत. असा हा श्वासाबरोबर चालणारा अजपाजप सर्वांच्याच ठिकाणी चालू राहतो. पण जाणत्याला तो कळतो.

समर्थ म्हणतात हे सहजसाधन सोडून सायासात पडू नको. एकदा जीवाचे शिवाशी, आत्म्याचे परमात्म्याशी तादात्म्य झाले की, प्रत्येक क्रिया ही त्याचीच

सेवा होते. तेथे देहभान नसल्याने कृत्रिम उपासनेची गरजच नसते. अशी ही मीपणाविरहित सहज होत असलेली सेवाच प्रभूला मान्य होते. हठयोगादी क्रियांच्या जंजाळात साधकाने पडू नये असेच समर्थ रामदासांना सांगायचे आहे.

## परिवर्तन हा जगाचा स्वभाव

सृष्टीची प्रथाच अशी आहे, स्वभाव असा आहे की तिच्यात सतत परिवर्तन होत असते. बहुरत्ना वसुंधरा असे का म्हटले जाते याचा नीट विचार करा असे समर्थांनी आवर्जून सांगितले आहे. त्यानुसार जगरहाटीप्रमाणे, विवेकाने समजुन-उमजून वागाल तर तुम्हाला सुख-संतोष लाभेल अशी गुरुकिल्लीच समर्थ रामदासांनी दिली आहे.

जगरहाटी समजून सांगताना व्यवहारी, दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणे त्यांनी सांगितली. त्यामुळे विषय सोपा करून मांडला आहे, संपन्नता कायम टिकणारी नसते. रहाटगाडग्याप्रमाणे एक भरते दुसरे रिकामे होते. चक्रमेनिक्रम हा सृष्टीचा नियम आहे. बालपण, तरुणपण कायम टिकत नाही. दुपारची सावली जशी थोडाच वेळ पायाखाली टिकते तशीच संपत्तीही थोडावेळ टिकून नाहीशी होते. आयुष्यातील वर्षेही हळूहळू निघून जात असतात. म्हणून देहाला जसे वळण लावावे तसा तो होतो. त्याचे सार्थक करण्याचा प्रयत्न केला तर ते कार्यही साध्य होते तर मग कष्टी होण्याचे, निराश होण्याचे कारणच काय?

समर्थ उसाच्या पिकाचे उदाहरण देऊन सांगतात. उसात पाण्यामुळे गोडी येते आणि पाण्यामुळे विषवल्लीही फोफावते तसे माणसाला मुळातच उत्तम संगत, उत्तम गुण हवेत. त्यामुळे कल्याण होईल. पण वाईट संगतीमुळे माणूस घातकी बनेल. सज्जनांची संगत करा, विवेकाच्या बळावर देहाभिमान सोडून या भवसागरातून पार पडा.

उद्योगी, प्रयत्नशील, शहाण्या माणसांची संगत कराल तर शहाणे व्हाल आणि या उलट जर आळशी आणि मूर्खांची संगती कराल तर आळशी आणि मूर्ख बनाल. उत्तम संगतीचे फळ सुख असते तर अधम संगतीने दुःख प्राप्त होते.

भगवद्गीतेच्या १६ व्या अध्यायात 'मनुष्याने सद्गुण व सदाचरण करून संसाराच्या व जन्ममरणाच्या बंधनातून मुक्त झाले पाहिजे. त्यासाठी दंभ, दर्प, अभिमान, काम, क्रोध, लोभ इत्यादी आसुरी-संपत्तीच्या गुणांचा त्याग करून अभय, अहिंसा, अक्रोध, दया, यज्ञ, दान, तप वगैरे दैवी संपत्तीचे गुण अंगिकारले पाहिजेत असे म्हटले आहे. गीतेच्या १७ व्या अध्यायात मात्र जे लोक शास्त्रविधी जाणत नाहीत त्यांच्यासाठी सोपा मार्ग सांगितला आहे तो जे काही शुभ काम करतो ते श्रद्धापूर्वक देवाचे स्मरण करून, देवाचे नामोच्चारण करूनच करावे. यासाठी समर्थ रामदासांनी जय जय रघुवीर समर्थ असे उच्चरवाने सांगून 'श्रीराम नामाचा' मंत्र दिला आहे.

सज्जनगडावर आपला देह वयाच्या ७३ वे वर्षी (माघ वद्य ९ शके १६०३ शनिवार) ठेवताना समर्थांनी शेवटी उद्‌गार काढले.

**'आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।'**

***

**देह त्यागिता कीर्ति मागे उरावी ।**
**मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।।**
**मना चंदनाचे परी त्वा झिजावे ।**
**परी अंतरी सज्जना नीववावे ।।**

# दासबोध म्हणजेच मानसशास्त्र

भक्तीच्या योगानेच मनुष्यास निश्चितपणे ईश्वराची प्राप्ती होते. या ग्रंथात अध्यात्माकडे साधकाला आकर्षित करण्यासाठी संत रामदासांनी चमत्काराचे आमिष दाखवलेले नाही हे विशेष. हा ग्रंथ श्रवण केल्याने काय फळ मिळेल? या श्रोत्यांच्या प्रश्नाला सरळ उत्तर आहे 'हा ग्रंथ श्रवण केल्याने श्रोत्यांच्या मनातील सर्व संशय समूळ नष्ट होऊन त्यांच्या आचरणात तत्काळ फरक पडतो. वैराग्य अंगी बाणते व अंतर्यामी विवेक उत्पन्न होऊन यथायोग्य चातुर्याची प्राप्ती होते.

दासबोधात रामदास स्वामींनी चमत्काराला प्राधान्य दिले नाही पण दासबोध हा ग्रंथ तुमच्या जीवनात चमत्कार घडवू शकतो. मानवी मनातील सूप्त शक्तींचा वापर करून जीवन परिवर्तन करता येते हे आधुनिक मानसशास्त्रज्ञ सांगते. संत रामदासांनी भारतीय धर्म-अध्यात्माच्या भाषेतून जे मांडले ते मानसशास्त्रच आहे.

एक मनुष्य दु:खी आणि दुसरा सुखी का असतो? एखादा श्रीमंत आणि दुसरा गरीब का? एखादा भित्रा का आणि दुसरा श्रद्धावान आणि आत्मविश्वासू का? एखादा आलिशान घर गाडीत वावरतो नि दुसरा झोपडपट्टीत का ? एखादा जीवनात यशस्वी होतो नि दुसरा अपयशी का ? अशा प्रश्नांना मानसशास्त्र जी उत्तरे देते त्यात आणि भारतीय मानसशास्त्रात विलक्षण साम्य आहे. तुमच्या जीवनात अधिक शक्ती, अधिक संपत्ती, चांगले आरोग्य, अधिक आनंद, उत्साह, शांती आणू शकता. त्यासाठी तुम्हाला अंतर्मनाशी सुसंवाद साधता आला पाहिजे आणि अंतर्मनातील सुप्तावस्थेत असणारी शक्ती प्रगट करता आली पाहिजे. ही शक्ती तुम्हाला नव्याने मिळवायची नसते. ती तुमच्या अंतरंगात असतेच. तुम्हाला ती कशी वापरायची याचे ज्ञान नसते इतकेच. जीवनाच्या विविध क्षेत्रात तिचा यशस्वी वापर कसा करायचा हे शिकावे लागते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे दीपक चोप्रा, गॅरी झुकाव्ह अशा मनोतज्ज्ञाकडे जाण्याची आवश्यकता नाही. राम दास स्वामींचे मनाचे श्लोक, दासबोध अभ्यासला की त्यात ही रहस्ये स्पष्ट केली आहेत. त्यातून अंतर्मनातील सूप्त शक्तींचे भांडार खुले करण्यासाठी तमोगुणाकडून सत्त्वगुणाकडे कशी वाटचाल करायची याचे सार्थ मार्गदर्शन केलेले आहे.

अंतर्मन आणि बाह्यमनातील तणाव नाहीसा करण्यासाठी, संघर्ष संपवण्यासाठी आपण बाह्यपरिस्थितीशी संघर्ष करतो. त्यातून प्रश्न मिटत नाही. आम्ही त्या तणावाचे कारण शोधत नाही. ते प्रथम शोधावे लागेल आणि ते कारण बदलले की आपोआप मनात परिवर्तन होते. आतील स्थिती सुधारते.

रामदास स्वामींच्या शब्दात 'तेचि वस्तू संतसंगे। स्वानुभवें कळो लागे । संतांच्या संगतीने स्वस्वरूपाचा अनुभव तुम्हाला येईल आणि आत्मवस्तू कशी आहे हे तुम्हाला कळेल. मानवी मनाचे, वर्तनाचे विविध प्रकार अत्यंत तपशिलात रामदास स्वामींनी दशक दुसरा समास पहिला यात वर्णन केले आहे. प्रारंभी माणसाचे कसे असू नये हे सांगताना त्यांनी मूर्खलक्षण सांगितले. त्यामागचे खरे कारण अज्ञान असते. हे अज्ञान नाहीसे झाले तर आपोआप मूर्खपणा नाहीसा होईल. कार्य बदलण्यास कारण बदलावे लागते. या मूर्खाशिवाय दुसरा एक प्रकार रामदास स्वामींनी स्पष्ट केला तो म्हणजे पढतमूर्ख. एखादा माणूस बहुश्रुत, विद्वान व ब्रह्मज्ञान चांगले जाणणारा असेल पण स्वार्थ, वाईट इच्छा आणि दुरभिमान बाळगणारा असेल तर तो पढतमूर्ख - शहाणा मूर्ख असतो. मन आणि अंतर्मनातील अनेक गोष्टींची अशुद्धता त्याला अहंकाराकडे व शेवटी सर्वनाशाकडे नेते. म्हणून दासबोधात रामदास स्वामी म्हणतात -

*नाही भक्तीचे साधन । नाही वैराग्य ना भजन ।*
*क्रियेवीण बोले ब्रह्मज्ञान । तो एक पढतमूर्ख*
*उत्तम लक्षणे घ्यावी । मूर्ख लक्षणे त्यागावी*

असा निष्कर्ष काढून मानवी वर्तनात उत्कृष्टपणा यावा यासाठी उत्तम लक्षणे त्यांनी सांगितली. नीतीचे आचरण, धर्माचे पालन आणि त्यात व्यवहाराचे जतन या तीन गोष्टी महत्त्वाच्या मानल्या.

*सत्यमार्ग सोडू नये । असत्य पंथे जाऊ नये ।*
*कदा अभिमान घेऊ नये । असत्याचा ।*
*विवेक दृढ धरावी । वाट सत्याची*

खरा मार्ग सोडू नये. खोट्या मार्गाने जाऊ नये. खोट्याचा अभिमान कधी धरू नये. सत्याचा मार्ग विवेकाने घट्ट धरावा.

या उपदेशात सत्य आणि विवेकाचा मार्ग मानवाची उन्नती करणारा आहे.

## आधी प्रपंच करावा नेटका

विवेक जन हो ! प्रथम व्यवहार नेटकेपणे करा आणि मग परमार्थाचा विचार करा. त्यात आळस करू नका. असे आवाहन करताना रामदास स्वामी इशारा देतात की, प्रपंचाकडे दुर्लक्ष करून तुम्ही परमार्थ साधण्याचा प्रयत्न कराल तर कष्टी व्हाल, पण सावधपणे दोन्ही कराल तरच तुम्हाला विवेकी म्हणता येईल. प्रपंचाकडे दुर्लक्ष करून परमार्थ करू लागल्यास उपाशी मराल आणि परमार्थ सोडून फक्त प्रपंच करतो म्हणाल तर जीवन कष्टमय होईल.

साधकाच्या विवेक-वैराग्याची कसोटी प्रत्यक्ष संसारातील व्यवहारात होत असते. व्यवहारातही ज्याची धारणा ढळत नाही. तोच साधक योग्य असतो. नेहमी योग्य काय, अयोग्य काय याचा विचार करून तो वागत असतो. याच्या उलट जो प्रपंचात अत्यंत दक्ष असतो, तोच परमार्थही नीट करू शकतो ज्याला व्यवहार नीट सांभाळता येत नाही त्याची अध्यात्मातही प्रगती होऊ शकत नाही.

विवेकी माणसाच्या ठिकाणी दूरदृष्टी असावी, त्याने निरंतर परिस्थितीचा अंदाज घेत असावे आणि विचाराने पुढे काय होणार आहे, याचा अचूक अंदाज बांधून परिस्थिती हाताळावी. जे याप्रकारे दक्ष असतात ते सुखी होतात. जे बेसावध असतात ते दुःखी होतात. अचानक संकट उभे ठाकले तर सावरायलाही वेळ मिळाला नाही असे तुमच्या वाट्याला यायला नको असेल तर तुमच्या भोवती जे लोक असतील त्यांची पारख करा. जे गुणवान आहेत, शहाणे आहेत त्यांची संगत करा. त्यांचे गुण घ्या. लोकांमधील जे अवगुण असतील ते पाहून त्या अवगुणांचा त्याग करावा.

पण हे सारे करीत असताना कोणाचे मन दुखावले जाणार नाही ना याची काळजी घ्या असे सांगण्यास रामदास स्वामी विसरले नाहीत. ज्याची जशी योग्यता आहे त्याप्रमाणे त्या लोकांचा यथोचित गौरव करण्याचे चातुर्य अंगी बाळगावे.

*ज्यांचे त्यापरी गौरव । राखो जाणे ।*

प्रपंचात मनासारखे घडावे असे वाटत असेल तर प्रथम लोकांचे मनोगत ओळखायला शिका. त्यामुळे लोकांना आवडेल असे वागता येईल. मूर्खपणामुळे अनेक बाबतीत लोकांची भांडणेच होतात. त्यामुळे आपण आणि लोक दोघेही दुःखीकष्टी बनतो. 'माझेच खरे' हा जनस्वभाव आहे. लोकांचे सोसावे व खरेपणाने वागावे.

रामदास स्वामी चंदनाची उपमा देऊन मानवी वर्तनाची दिशा दाखवतात. ते सांगतात, आपण कोण आहोत, आपली लायकी काय आहे हे लोकांना जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत खरा थोर पुरुष विवेकशील आणि क्षमाशील राहातो. जोपर्यंत चंदन झिजत नाही तोपर्यंत त्याचा सुगंध लोकांना कळत नाही. जोपर्यंत सुगंध कळत नाही तोपर्यंत चंदन आणि इतर वृक्ष लोक सारखाच मानतात.

जसे आपण पेरतो तेच उगवून येते. लोकांशी व्यवहार करताना उसने घ्यावे-द्यावे लागते. आपण कोणाचे गुप्त रहस्य प्रगट केले तर त्याचे अंत:करण दुखावले जाते. लोकांशी आपण चांगले वागलो तर आपले सुख वाढते. त्यांचा प्रतिसादही तसाच बरा-वाईट येतो. म्हणून लोकांनी आपल्याशी कसे वागावे याचा उपाय आपल्याच हातात असतो. लोकांना उगीच दोष देणे योग्य नाही. त्यापेक्षा आपणच आपल्या मनाला क्षणोक्षणी शिकवावे.

*हें अवघे आपणापासी । येथा बोल नाही जनासी*

*सिकवावे आपल्या मनासी । क्षणक्षणा*

समजा, एखाद्या अत्यंत दुर्जनासी गाठ पडली आणि क्षमा करणे अगदी अशक्य झाले तर गुपचूप न बोलता साधकाने ते स्थळ सोडून निघून जावे.

लोक अनेक प्रकारे परीक्षा करणे जाणतात. पण त्यांना दुसऱ्याच्या अंत:करणाची पारख करता येत नाही म्हणूनच माणसे भाग्यहीन ठरतात.

आपण आज ना उद्या मरणार आहोतच हे जाणून सर्वांशी भलेपणाने वागावे. या प्रकारचा विवेक करणे कठीण आहे. हे मात्र खरे. नित्य हरिकथा आणि अध्यात्मनिरूपण करीत असावे. प्रसंग पाहून चांगुलपणाने राजकारणही करावे. प्रसंगानुरूप विवेकाने वागलो नाही तर सर्वच व्यर्थ ठरते.

## संसारामध्ये कसे वागावे? वर्तनशास्त्र

रामदास स्वामी अत्यंत व्यवहारी दृष्टीचे मानसशास्त्रज्ञ म्हणावे लागतील. दैनंदिन जीवनात निरंतर समाधान कसे लाभेल? मनास विषयापासून दूर कसे ठेवावे? कोणी अपमान केला तर कसा विचार करावा? दुर्जनाशी कसे वागावे? आपली स्वतंत्रता कशी जपावी? असे एक ना दोन, अनेक प्रश्नांचे तरंग मनात

उमटतात. यावर त्यांनी सुस्पष्ट पण सोप्या, समजणाऱ्या भाषेत उत्तर दिले आहे. या साऱ्या मागचा त्यांचा दृष्टिकोन समाजाचे मन जाणल्याप्रमाणे आहे. त्यांच्याच भाषेत

*'सोपा मंत्र परी नेमस्त । साधे वोषक गुणावंत*

*साधे बोलणे सप्रचीत । तैसे माझे.'*

माझे बोलणे साधे असेल तरी प्रचितीचे आहे. जसे औषध साधे असावे पण ते गुण देणारे असावे.

आधुनिक यंत्रयुगात, दूरदर्शनच्या वाहिन्यांच्या, चित्रपटांच्या मोबाईलच्या जमान्यात लहान मुलीपासून, विवाहितांवर बलात्काराचे वाढते प्रकार समाजात घडत आहेत. कायदा त्यावर अंकुश ठेवू शकत नाही. त्यासाठी मनावरच अंकुश ठेवला पाहिजे. यासाठी समर्थ सांगतात. स्त्रियांकडे वाईट नजर जाऊ देऊ नका. मनामध्ये विषयचिंतनाची गोडी लावू नका. लोभीमनाने स्त्रियां आणि द्रव्य याकडे लक्ष जाऊ देऊ नये.

धड व स्वच्छ वस्त्र नेसावे. गोड अन्न खाऊ नये. देहदु:ख आजारपण आले म्हणून मानसिक त्रास करून घेऊ नये. अधिक गंभीर आजार असेल तर पुढे जगण्याची आशा धरू नये. विरक्त, अनासक्त वृत्ती कधी सोडू नये. धैर्य कधी सोडू नये. विवेकाच्या बळावर ज्ञान कधी मलिन होऊ देऊ नये. अंतर्यामी भगवंताचे ध्यान सतत करावे. सगुणमूर्तीच्या ठिकाणी जडलेल्या प्रेमाचा धागा कधी तोडू नये. कष्ट झाले म्हणून खेद मानू नये. वेळप्रसंगी धीर सोडू नये. कोणी अपमान केला म्हणून कष्टी होऊ नये आणि कोणी धिक्कार केला तरी मनात झुरू नये.

शुद्ध आचरणाचा मार्ग सोडू नये. दुर्जन माणसाशी वादविवाद, भांडण करू नये. चांडाळाशी संपर्क टाळावा. कोणी मुद्दाम भांडण लावण्याचा प्रयत्न केला तरी भांडू नये. मनाची समतोल स्थिती सोडू नये. नित्य भ्रमण करीत राहावे. नेहमी एकच वेष करू नये. कुणाला जामीन राहू नये. नियमितपणाच्या बंदिस्त राहू नये. आपला नित्यनेम कधी सोडू नये. रोजच्या रोज अभ्यास करावा. त्यात चूक होऊ देऊ नये. स्वातंत्र्य हरवू नये. नेहमी निरपेक्ष असावे. क्षणाक्षणाला दुसरा मदत करील ही अपेक्षा कधी करू नये.

कधीही उच्छृंखलता (अनर्गळता) स्वेच्छाचार करू नये. कधीही कोठेही आसक्त होऊ नये. परंपरेचे रक्षण करावे. कधीही ज्ञानमार्गाचा त्याग करू नये.

अतिवाद करू नये. मनाची व्यापकता कधी त्यागू नये. आपला स्वार्थ साधण्यासाठी दुसऱ्याला आज्ञा करू नये. सर्वांचेच काम होईल तर आज्ञा करावी. प्रसंग पडल्याशिवाय उगीच बोलू नये. आग्रहाशिवाय गाऊ नये. विचार न करता अयोग्य मार्गाने जाऊ नये.

परोपकार केल्याशिवाय राहू नये मात्र परपीडा कधी करू नये. लोकांच्यात वितुष्ट निर्माण होईल असे काही करू नये. आपल्याला सर्व कळते असे कधी मानू नये. द्रव्यासाठी गावोगाव कीर्तन करीत हिंडू नये. समजावून सांगण्याचे सामर्थ्य असल्याशिवाय लोकापुढे ग्रंथ वाचू नये. आपल्या मोठेपणाचे प्रदर्शन करू नये. ज्ञानाचा गर्व धरू नये. सहसा कुणाची टवाळी करू नये. कुठेही उगीच कुणाशी वाद घालीत बसू नये.

*बहुयाल बोलो नये । अबोलणे कामा नये ।*

*बहुत अन्न खाऊ नये । उपवास खोटा*

*बहु साल निजों नये । बहुत निद्रा मोंडू नये*

फार लोकाचार सोडू नये, पण लोकांच्या अधीन होऊन राहू नये. कुणावरही फार प्रेम करू नये पण निष्ठुर वागू नये. फार संशय धरू नये.

ज्ञातेपणाचा अभिमान धरू नये हे बरोबर आहे पण म्हणून ज्ञानाशिवाय राहणेही उपयोगी नाही. मनात कोणती तरी स्वार्थबुद्धी ठेवून बोलू नये. वक्त्याने श्रोत्यांनी शंका घेतली तर त्यांच्याशी भांडू नये. श्रोत्यांचा कधीही कंटाळा मानू नये.

*ही सिकवण धरता चित्ती । सकळ सुख वोळगती*

*अंगी बाणे महंती । अवस्मात.*

ही शिकवण जर चित्तात दृढ धरली आणि त्याप्रमाणे वागले तर सर्व सुखे प्राप्त होतात आणि अवस्मात महंताचे गुण आपल्या ठिकाणी प्रगट होऊ लागतात.

***

# रामभक्त कवी मोरोपंत

रामदासस्वामींच्यानंतर जवळजवळ शंभरवर्षाने मोरोपंत रामचंद्रपंत पराडकर या थोर महाराष्ट्रीयन कवीचा जन्म इ.स. १७२९ ला कोल्हापूरजवळच्या पन्हाळगडावर झाला. तेथे ते लहानाचे मोठे झाले. त्यांनी संस्कृत स्वलिखित २० ग्रंथ (शकासह) व इतर शक नसलेले स्वलिखित ग्रंथ - २३, स्वतःसाठी परंतु दुसऱ्याकडून लिहून घेतलेले ग्रंथ - ७. इतकी विपुल साहित्यनिर्मिती केली. वयाच्या ६५ व्या वर्षी इ.स. १७९४ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांनी पंचवटीत श्रीरामापाशी उत्कृष्ट वर पुढीलप्रमाणे मागितला.

*''श्रीरामा ! नाम तुझे माझ्या वदनांत सर्वदा राहो ।*
*साहो मन भोगांते, गृहाचिंतेते न हे कधी वाहो ।।१।।*
*तू माय, बाप, बंधु, प्राणप्रिय मित्र, सोयरा, रामा ।*
*जडजीवा नाम तुझे प्रतिपाळी बाळका जया आमा ।।२।।*
*तुज हात जोडितो जो त्याचे अपराध घालियो पोटी ।*
*साधु कवी बहु गाती श्री रघुवीर ! तुझी जशे मोटी ।।३।।*
*सीताकांता ! वीरा ! धीरा ! मज पाव राघवा ! देवा ।*
*दे वास पदीं चित्ता नित्य प्रेमें घडो तुझी सेवा ।।४।।*
*संतांचा संग घडो, कीर्ति तुझी सर्वदा पडो कानी ।*
*आवडि फार धरावी श्रीरामा ! तव गुणांचिया गानी ।।५।।*
*नमितां श्रीरामा ! त्वां तत्काळ दिली बिभिषणा लंका ।*
*यास्तव मी अपराधी आलो शरण त्यजूनियां शंका ।।६।।*
*चरणरजेंचि अहल्या उद्धरिली त्वां असें मला कळले ।*
*ह्मणुनि विनवितों रामा ! निर्मळ हे मन करी अघे मळले ।।७।।*
*सुग्रीवाची चिंता हरिली मारूनियां बळी वाळी ।*
*शरणागतासि जैसा पाळियी तैसा न बापही पाळी ।।८।।*
*तूं सागर करूणेचा रामा ! तुजलाचि दुःख सांगावे ।*
*तुज सोडुनि इतरालां दीने पसरोनि तोंड का गावे ? ।।९।।*

*श्री रघुनाथा ! जपतो श्रीशंकरही सदा तुजे नाम ।*
*बा ! तूंचि लहानाचे थोरांचे सर्व पुरवियी काम ।।१०।।*
*मुक्त अजामिळ झाला नामें, तरली तसीच ते गणिका ।*
*रामा ! मज फार नको, नामसुधेची तुझ्या पुरे कणिका ।।११।।*
*नाम मुखाला येते परि निववीना मनासि अद्यापी ।*
*विषयांते वांधितसे, अमृत प्राशूनि कोण मद्या पी ? ।।१२।।*
*कां, गुण न करी ? न कळे ! नामे तो सर्व दुःख उडवावे,*
*प्रभु पाहतां पदांनी दृष्टे दीनासि काय तुडवावे ? ।।१३।।*
*अपराध शतहि घडतां दीनी न कधीही नाम रागेले ।*
*रामा ! धन्य न करिता त्यजुनि न कोणाहि पामरा गेले ।।१४।।*
*माझे सत्त्व पहातें श्रीरामा । नाम हे तुजे काय ?*
*परम सदय ते दीना लावील कसे म्हणावया 'हाय' ।।१५।।*
*रामा ! तव नामाचें ते तेज क्षीण कलियुगी जाले ।*
*हे तो न घडे, गाता यास सुखे दासवृंद बहु धाले ।।१६।।*
*करूनि प्रसाद कुतुके न कळो दिधला सुदामदेवास !*
*करिसी तये बहुधा या भक्त मथूरा पदीच दे वास ।।१७।।*
*रामा ! मेघश्यामा ! कामारातिप्रिया ! रमाधामा !*
*बा ! माय जशी आमा, या माझ्या दे मुखी सदा नामा ।।१८।।*

*(मोरोपंत 'पंचवटीस्थ राम प्रार्थना)*

**संदर्भ :** महाराष्ट्र कविवर्य मोरोपंतांचे चरित्र व काव्यविवेचन
श्रीरामदासानुदास - प्रो. श्रीधर विष्णु परांजपे
श्री सूर्यदेवमठ, हनुमानगड, वर्धा - १९२५.

***

**श्री राम जय राम जय जय राम । श्री राम जय राम जय जय राम ।**

**श्री राम जय राम जय जय राम । श्री राम जय राम जय जय राम ।**